अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
www.surajyadigital.com | सोमवार, दि. ५ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २४६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## हन्नूर येथे विवाहित तरुणाची आत्महत्या; पत्नी आणि सासऱ्याविरुद्ध गुन्हा

सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यातील हन्नुर येथे एक महिन्यापूर्वी गळफास घेऊन विठ्ठल रामचंद्र बाळशंकर (वय ३२) याने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी मयताची पत्नी आणि सासऱ्याविरुद्ध अक्कलकोट उत्तरच्या पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केला आहे. वैशाली विठ्ठल बाळशंकर (वय २८) आणि तिचे वडील चंद्रकांत कैलास सुरवसे (दोघे रा.सराटी ता.तुळजापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

मयत विठ्ठल बाळशंकर याची पती वैशाली ही पतीबरोबर पटत नसल्याने काही दिवसापूर्वी माहेरी गेली होती. त्यानंतर २६ एप्रिल रोजी विठ्ठल बाळशंकर याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केला होता. वैशाली आणि चंद्रकांत सुरवसे हे दोघे त्याला फोन करून लग्नात झालेला खर्च एक लाख रुपये दे, नाहीतर तुझ्याविरुद्ध हुंडाबळीची केस दाखल करतो. असे म्हणून त्याला फोनवरून धमकी देत होते. त्यांच्या त्रासाला कंटाळून विठ्ठल याने आत्महत्या केली. अशा आशयाची फिर्याद मयताचे वडील रामचंद्र बाळशंकर (वय ५५ रा.हन्नुर) यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास फौजदार चव्हाण करीत आहेत.



# सूर्य कोपला, मान्सून लांबला, बळीराजा अडला, कधी होणार फैसला?

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूर जिल्ह्यात अकरा दिवस झाले, रोहिणी नक्षत्राचा समाधानकारक पाऊस झाला नाही. गेल्या महिनाभरापासून सूर्याचे तळपणे सुरूच असल्याने सोलापूरसह जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची मागणी वाढत आहे. मान्सूनचा थांगपत्ता नाही. पावसाअभावी खरीप पेरण्या खोळंबल्या आहेत. उजनी धरणातील पाण्याची पातळी मायनस २५ टक्क्यांपर्यंत गेली आहे. जून महिन्यातही पाऊस लांबल्यास सोलापूरसह जिल्ह्यावर जलसंकट ओढवण्याची शक्यता आहे. पूर्वानुभव पाहता दक्षता म्हणून आत्तापासूनच उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात उच्चस्तरीय बैठक होऊन यावर चिंतन होण्याची गरज आहे.**



**शेतकऱ्यांमध्ये वाढली चिंता... :** खरीप पेरण्यासाठी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मोठा पाऊस होण्याची अपेक्षा असते पण म्हणावा तितका समाधानकारक पाऊस झालेला नाही. शेतकरी मशागतीची कामे करून पावसाची प्रतिक्षा करत आहे. कृषी विभाग बियाणे आणि खतांची उपलब्धताही केली आहे पण पाऊसच नसल्याने खरीप पेरण्या लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

**तर पुन्हा टँकर सुरू करावे लागतील :** सोलापूर जिल्हा टँकरमुक्त झाला आहे. जून महिन्यात पावसाने ओढ दिल्यास जिल्ह्यात १० वर्षांनी पुन्हा टँकर सुरू करावे लागतील, असा सूर जाणकार अधिकाऱ्यांमधून दबक्या आवाजात उमटत आहे. महाराष्ट्रात १० जूनला मान्सूनचे आगमन होणार,अशी रविवारचीच बातमी आहे पण आपला सोलापूर जिल्हा परतीच्या पावसात मोडतो, असे जाणकार सांगतात. सोलापूर शहराचा विस्तार वाढत आहे. इथेही पाण्याची मागणी वाढते आहे. जिल्ह्यात सिंचन क्षेत्रातही वाढ झाल्याने शेतीसाठी पाण्याची मोठी गरज आहे. जून-जुलैमध्ये समाधानकारक पाऊस पडला तर सोलापूरची धडगत ठीक असणार आहे. अन्यथा भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागेल. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात आत्मचिंतन होण्याची आवश्यकता आहे.

सोलापूरसह जिल्ह्यातील पाण्याची भिस्त उजनी धरणावरच अवलंबून आहे. मे महिन्यात उजनी मायनसमध्ये जात असते. पुढे जून महिन्यातही पावसाने ओढ दिल्यास सोलापूरसह जिल्ह्यात पाण्याची टंचाई उद्‌भवते. हा आतापर्यंतचा अनुभव आहे. उजनी पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी पुणे जिल्ह्यात व उजनीच्या कॅचमेंट एरियात मोठा पाऊस पडावा लागतो. त्याखेरीज उजनी भरत नाही. जून महिन्यात किमान ५० टक्क्यांपर्यंत तरी उजनी भरली तर पिण्याच्या आणि शेतीसाठीचा पाण्याचा प्रश्न इतका गंभीर होत नाही. कारण ऑक्टोबरपर्यंत पाऊस असतो. त्या कालावधीत उजनी १०० टक्क्यांनी भरली तर सोलापूरकरांचे नशीब बलवत्तर मानले जाते.पुणे जिल्ह्यातही पाऊस नाही झाला तर सोलापूरची काही खैर नाही. सोलापूरकरांचे पाणी पितात. कोण कोण पळवतातही. पण सोलापूरकरांच्या घशाला कोरड पडली की, शेजारचे जिल्हे आपल्यालाच पाणी द्यायला तयार नसतात. पुणे जिल्ह्यातील धरणांमधून पाणी मागितल्यानंतर पुण्यातील नेते लागलीच नाके मुरडायला लागतात. हा २००४ चा ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असतानाचा कटुअनुभव. जिल्ह्यावरची भीषण पाणी टंचाई पाहून पवना धरणातून ४ टीएमसी पाणी सोडण्याचा आदेश त्यांनी दिला होता. त्यावेळी पुणेकरांनी आंदोलनाची भाषा केलेली होती. इकडे कर्नाटकातील इंडी तालुक्यातील लोक उजनीतून भीमा नदीत सोडलेल्या पाण्याचा लाभ घेतात पण कर्नाटक सरकार आलमट्टीमधून पाणी द्यायला तयार नसते. अशा अवस्थेत उजनीतून कर्नाटकसाठी पाणी सोडण्याची मागणी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी करावी, हा किती अजब प्रकार.

### नाकापेक्षा मोती जड...

जिल्ह्याची वरदायिनी असणाऱ्या उजनीतून तीन टीएमसी पाणी देण्यासाठी भीमा नदीतून एकूण १० टीएमसी पाणी सोडावे लागणार आहे. कर्नाटकसाठी पाणी सोडल्यास उजनी सोलापूर शहरांसह इतर योजना बंद पडतील. त्यातच पुन्हा पाऊस लांबल्यास सोलापूर शहरासाठी व जनावरांसाठी नदीतून एक आवर्तन सोडावे लागेल. अशा परिस्थितीत कर्नाटकसाठी पाणी सोडणे अशक्य असल्याचे शासनाला सादर करण्यात अहवालात म्हटल्याचे कळते. कर्नाटकला पाणी द्यायचे झाल्यास सद्य:स्थितीत 'नाकापेक्षा मोतीच जड' अशी अवस्था आहे. उजनी मायनस २५ टक्क्यांवर असून कर्नाटकला पाणी पोचण्यासाठी धरणातून १० टीएमसी पाणी सोडावे लागणार आहे. तर वारणा ते कर्नाटक १०० किलोमीटर अंतर असल्याने त्यासाठी दीड-दोन टीएमसी जास्त पाणी सोडावे लागेल.सद्य:स्थितीत उजनी धरण मायनस २५ टक्क्यांवर गेले असून आता कॅनॉल, बोगद्यातून पाणी सोडणे अशक्य असून मायनस ७० टक्क्यांपर्यंत नदीतून पाणी सोडता येते, तेही केवळ पिण्यासाठीच तर धरणात सध्या ५०.६१ टीएमसी मृत पाणीसाठा असून त्यात १४ टीएमसीपर्यंत गाळ आहे. पाऊस लांबल्यास पुन्हा एकदा सोलापूर शहर व ग्रामीण भागासाठी नदीतून सोडावे लागेल तसेच आगामी पंढरपूर यात्रेसाठीही पाण्याची गरज आहे. भीमा नदीद्वारे उजनी ते औज हे अंदाजे १४३ किलोमीटर अंतर पार करायला सहा टीएमसी पाणी लागते. कर्नाटकला तीन टीएमसी पाणी देण्यासाठी किमान नऊ-दहा टीएमसी पाणी लागेल. त्यामुळे असा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला असून कर्नाटकसाठी पाण्याचा निर्णय हा वरिष्ठच घेतील. तो अधिकार आम्हाला नाही,असे धीरज साळे. (अधीक्षक अभियंता,उजनी लाभक्षेत्र विकास प्राधिकरण) यांनी म्हटले आहे.

## पत्नीस मारहाण करीत ५ वर्षाच्या मुलास वीष पाजले

### पतीने देखील केला आत्महत्येचा प्रयत्न

सुराज्य/सोलापूर

माहेरी राहण्या असलेली पत्नी नांदण्यास येत नसल्याचे पाहून पतीने तिला बेदम मारहाण केली. त्यानंतर सोबत आणलेल्या बाटलीतील विष स्वतःच्या ५ वर्षीय मुलाच्या तोंडात ओतून खुनाचा प्रयत्न केला. आणि उरलेले विष स्वतः प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना आनंदनगर (ता.माळशिरस) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी पतीविरुद्ध खुनाचा आणि आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

नितीन धनाजी काटकर (वय ३० रा. निमगाव ता.माळशिरस) असे आरोपीचे नाव आहे. त्याचा मुलगा सार्थक काटकर (वय ५वर्षे सध्या रा.निमगाव) हा जखमी असून त्याला अकलूजच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. या संदर्भात आरोपीची पत्नी सोनाली नितीन काटकर (वय २५ रा.निमगाव सध्या रा.आनंदनगर ता.माळशिरस) यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली. सोनाली काटकर या पतीबरोबर पटत नसल्याने काही दिवसापूर्वी निमगाव येथे माहेरी मुलासोबत राहण्यास आल्या होत्या. काल सकाळी नऊ वाजेच्या सुमारास तिचा पती धनाजी काटकर हा आनंदनगर येथे सासरी आला. त्या नंतर त्याने पत्नीस नांदायला का येत नाही ? असे म्हणून लाथाबुक्क्याने बेदम मारहाण केली आणि मुलगा सार्थक याला पकडून त्याच्या तोंडात बळजबरीने विषारी द्रव ओतले. त्यानंतर उरलेले विषारी द्रव त्याने स्वतः प्राशन केले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. सहाय्यक निरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

## गुळसडीत वीज पडून महिलेचा मृत्यू

सुराज्य/करमाळा

करमाळा तालुक्यातील गुळसडी येथे शेतात काम करत असताना दुपारी साडे तीन चार वाजण्याच्या सुमारास भुईमूग शेंगांचे वेल बैलगाडी घेऊन जाताना वीज पडून महिलेचा मृत्यू झाला आहे. कमल सुभाष अडसूळ (वय ४५) असे मृत महिलेचे नाव आहे. पुढील कार्यवाहीसाठी महिलेचा मृतदेह करमाळा उपजिल्हा रुग्णालय येथे आणण्यात आला आहे.



## सापळा दरोडेखोरांसाठी; पोलिसांच्या जाळ्यात दारुची गाडी

### आरोपींनी दारुच्या बाटल्या फेकून मारल्या
### बॅरिगेट्स तोडून निघालेले वाहन मंगळवेढ्यात पकडले

सुराज्य/सोलापूर

दरोडेखोरांचा शोध घेताना गोव्यावरून येणारी दारूची गाडी पोलिसांच्या जाळ्यात सापडली आहे. सांगलीतील रिलायन्स ज्वेलरी मध्ये ८ दरोडेखोरांनी आम्ही पोलीस असून चोरीचे सोने चेक करायचे आहे अशी बतावणी करून कर्मचाऱ्यांचे हात बांधून सोने लुटून मंगळवेढ्याच्या दिशेने पलायन केले होते.

दरम्यान सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीषकुमार सरदेशपांडे यांनी ग्रामीण यंत्रणेवरून याबाबत कॉल करून त्या गाडीचे वर्णन देऊन दरोडेखोरांना पकडण्याचे आवाहन यावेळी केले.

स्वत: पोलीस अधीक्षक सांगोला नाक्यावर थांबून,बॅरीगेट लावून वाहनाची तपासणी करीत असताना दरोडेखोरांचे वाहन सापडण्याऐवजी गोव्यावरून २८ हजार रुपये किंमतीची ३० बॉक्स दारू घेऊन जाणारे वाहन या तपासणीत पोलिसांना मिळून आले. पोलीस अधीक्षक सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमतराव जाधव, डी. वाय.एस.पी.विक्रांत गायकवाड, गुन्हे अन्वेषण विभागाचे सुहास जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक पोटे व त्यांची टीम मंगळवेढ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बापूसो पिंगळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक सौरभ शेटे, पोलीस हवालदार श्रीमंत पवार, हजरत पठाण, युवराज वाघमारे, अस्लम काझी, सचिन वाघ, शिवाजी पवार आदींनी शहराच्या महामार्गावर सांगोला नाका येथे बॅरीगेट लावून येणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी सुरू असताना गोव्यावरून दारू घेऊन येणारे वाहन पोलिसांना सापडले.पोलिसांना नाक्यावर पाहिल्यानंतर टोलवरील बॅरीगेट तोडून ते वाहन फरार झाले. आरोपींनी दारूच्या बाटल्या फेकून मारण्याचा प्रकार केल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. मंगळवेढ्यात ही गाडी पकडल्यानंतर ही दारू चडचण येथे विक्रिस जाणार असल्याचे चौकशीत आरोपीकडून सांगण्यात आले. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले आहे.



## वागदरीत बैलगाडीच्या शर्यतीत धक्का लागून वृध्द जखमी

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथे कारहुणवी सणानिमित्त काढण्यात आलेल्या बैलगाडीच्या शर्यतीत एका बैलाने दुसऱ्या गाडीला जोरदार धक्का दिल्याने गाडी उलटून ६० वर्षीय वृध्द शेतकरी गंभीर जखमी झाले.ही घटना शनिवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. जखमींना सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटलमधे वेळीच उपचार न करता दोन तास ताटकळत ठेवल्याने वृद्धाची प्रकृती अधिकच खालावल्याचे सांगण्यात आले.

साहेबलाल महताब मुल्ला असे त्या जखमी वृद्धाचे नाव आहे. कारहुणवी सणानिमित्त वागदरी गावामध्ये बैलांना सजवण्यात येऊन पळविण्याची शर्यत लावण्यात आली होती. त्यावेळी एका बैलाने बैलगाडीला जोरदार धक्का दिला. त्यामुळे बैलगाडीतील साहेबलाल मुल्ला हे रस्त्यावर फेकले जाऊन काही अंतरापर्यंत फरफटत गेले. डोक्याला मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना अक्कलकोट तसेच सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार करून सायंकाळी सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आणण्यात आले.



तेव्हा सिव्हिल हॉस्पिटल येथे ऑक्सिजन बेड नसल्याचे कारण सांगत त्यांना दोन तास ताटकळत ठेवले होते.त्यामुळे त्या वृद्ध व्यक्तींची प्रकृती अधिकच चिंताजनक बनली आहे. शेवटी नातेवाईकांनी त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणाची माहिती अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मिळताच सिव्हिल हॉस्पिटलच्या ढिसाळ कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शासनाकडून सिव्हिल हॉस्पिटलला मोठ्या प्रमाणात सुविधा मिळतात, निधी मिळतो, तो जातो कुठे? असा प्रश्न उपस्थित होतो. आमदार कल्याणशेट्टी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून सिव्हिल हॉस्पिटलच्या ढिसाळ कारभाराबाबत ते अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## सिद्धेश्वर तलावात महिलेचा मृतदेह

सोलापूर : शहरातील सिद्धेश्वर तलावात लक्ष्मी मधुसूदन कोंगारी (वय ४३ रा.राघवेंद्र नगर सोलापूर) या महिलेचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून हवालदार कटारे पुढील तपास करीत आहेत.

## मान्सून आज केरळात थडकणार?

महाराष्ट्रात १० जूनला आगमन

सुराज्य/सोलापूर

जून महिना सुरू झाला की, सर्वजण पावसाची आतुरतेने वाट पाहू लागतात. हवामान विभागाच्या अंदाजानुसार सोमवार दि.५ जूनपर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होणार आहे. महाराष्ट्रात १० जूनला मान्सून दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

उन्हाच्या झळांपासून कधी सुटका मिळणार याकडे सध्या सोलापूरकरांच सर्वांचे लक्ष लागलं आहे. गेल्या काही दिवसांपासून उकाडा वाढल्याने सोलापूरकर त्रस्त आहेत. त्यामुळे आता सगळ्यांनाच पावसाची प्रतीक्षा लागली आहे. मान्सून सध्या अंदमान आणि निकोबार बेटांपर्यंत पोहोचला आहे. दक्षिण अरबी समुद्रासह बंगालच्या उपसागरातील दक्षिण भाग तसेच अंदमान आणि निकोबार बेटांपर्यंत पोहोचलेल्या नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा प्रवास संथ गतीने सुरू आहे. गेल्या दोन दिवसांत मोसमी वारे दक्षिण अरबी समुद्राच्या काही भागासह बंगालच्या उपसागरातील दक्षिण भागात पोहोचले आहेत. त्यासोबत मौसमी वाऱ्यांनी अंदमान निकोबार बेटांचा उर्वरित भाग आणि श्रीलंका, मालदीव, कोमोरीनचा बरासचा भाग व्यापला आहे. त्यामुळे मान्सून सोमवारपर्यंत केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केला गेलाय.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सून आता वेगाने पुढे सरकत आहे, त्यामुळे हवामानात सातत्याने बदल होत आहेत. त्यामुळे कधी पाऊस पडतो तर कधी कडक ऊन पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रात १० जूनला मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या काही भागात मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता पुढच्या आठवड्यात राज्यात पाऊस सुरु होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आता हा कसला 'स्मार्टनेस' म्हणायचा ?

## वारकरी, भाविकांना उष्माघाताचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्या : ठोंबरे

सुराज्य/पंढरपूर

पालखी सोहळ्यासोबत आषाढी वारीसाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. दरवर्षीपेक्षा पालखी सोहळ्यांचे प्रस्थान अगोदर होत असल्याने उन्हाळ्याचा त्रास वारकरी भाविकांना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सजग राहत वारकरी, भाविकांना उष्माघाताचा त्रास होणार नाही यांची दक्षता घेऊन पालखी तळावर व मार्गावर मुबलक पाणी पुरवठा व पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवावा अशा सूचना प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिल्या.



आषाढीवारी पूर्वनियोजनाबाबत शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रांताधिकारी गजानन गुरव, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले,पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसन्न भातलवंडे, तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आगमन २३ जून तर जगद्‌गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे आगमन २४ जून २०२३ रोजी होत आहे. अन्य संतांच्या पालखी सोहळ्यासोबत आषाढी वारीसाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. दरवर्षीपेक्षा पालखी सोहळ्यांचे प्रस्थान अगोदर होत असल्याने उन्हाळ्याचा त्रास वारकरी भाविकांना होऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेऊन पालखी तळावर व मार्गावर मुबलक पाणी पुरवठा व पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना केल्या.

पालखी तळावर सुविधांमध्ये पाणी व्यवस्था, आरोग्य सुविधा, आपत्कालीन कक्ष, शौचालय, अग्निशमन व्यवस्था आदीबाबतचे माहिती फलक लावण्याच्या सूचना ठोंबरे यांनी दिल्या.

नगरपालिकेने यात्रा कालावधीत स्थानिक लोकसंख्या तसेच येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेऊन मुबलक प्रमाणात पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी. तसेच शहरातील नगरपालिकेच्या बोअरवेलसह खाजगी बोअरवेलव्दारे पाणीपुरवठा करावा तसेच नदी पात्र, ६५ एकर, मंदिर परिसर येथील वेळोवळी स्वच्छता करावी अशा सूचनाही प्र. जिल्हाधिकारी ठोंबरे यांनी दिल्या. त्याचबरोबर हरीत वारी आणि निर्मल वारीसाठी सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी पालखी तळांवर व मार्गावर वारकरी भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तर ६५ एकर, नदी पात्र तसेच शहरात नगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती यावेळी मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी दिली.

# प्रशासनाची डोळेझाक

ओरिसा राज्यातील बालासोर येथील रेल्वेच्या भीषण अपघाताची दृश्ये पाहिल्यानंतर साऱ्या देशाचे हृदय पिळवटून गेले. प्रशासन डोळे झाकून काम करत राहिल्यास लोकांचा जीव असा धोक्यात येऊ शकतो, हे बालासोरच्या घटनेने अधोरेखित केले आहे. नेहमीप्रमाणे नेत्यांनी दुःख व्यक्त केले तर मागच्या दाराने हळू यात राजकारणही आणण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. दिवंगत माजी पंतप्रधान लालबहाद्दर शास्त्री यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून रेल्वे मंत्र्यांनी राजीनामा द्यायला हवा, अशी मागणी शास्त्रींना कधी हार न घातलेल्या एका नेत्याकडून केली गेली. अशांना प्रसंगाचे कसले दुःख लागून गेलेय. राजीनाम्यापेक्षा जखमींना मदत करण्याची गरज आहे.मृतांच्या नातेवाईकांना धीर देण्याची आवश्यकता आहे. मदतकार्य करणाऱ्यांना ताकत दिली पाहिजे. असे असताना राजीनाम्याची मागणी करणे कितपत शहाणपणाचे आहे. हा अपघात का आणि कसा झाला? याचे निष्कर्ष आता समोर येतायेत. प्रथमदर्शनीचा अहवाल पाहाता रेल्वे प्रशासनाची यात गंभीर चूक असल्याचे दिसून आले आहे.आज रेल्वेत तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात आले आहे. धोक्याचा सिग्नल ओलांडणाऱ्या रेल्वे गाड्यांना संरक्षण देणे आणि दोन गाड्यांमधील टक्कर टाळण्यासाठी रेल्वेने कवचप्रणाली विकसित केलेली आहे. दुर्दैवाने बालासोर येथे ही प्रणाली उपलब्ध नव्हती. कवच प्रणालीद्वारे रोखता येऊ शकला असता, असा युक्तिवाद आता केला जाऊ लागला आहे. या भीषण रेल्वे अपघातावर अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केली जात आहेत. या अपघाताचे कारण काय? अपघात होण्यामागे कुणाची चूक होती? याची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले आहेत. एका बाजूला अपघातात जखमी झालेल्यांना



वाचविण्यासाठी ओडिशा आणि केंद्र सरकार हरएक प्रकारे मदत करत आहे. जखमींवर उपचार होत असलेल्या रुग्णालयांबाहेर रक्तदान करण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या आहेत. मानवतेसाठी हे सकारात्मक चित्र आहे. तरीही हा अपघात टाळता आला असता का? ज्या मार्गावर अपघात झाला तिथे रेल्वेची कवचप्रणाली का नव्हती, याबाबतचा प्रश्न उपस्थित होत आहे. रेल्वेचे प्रवक्ते अमिताभ शर्मा यांनी माहिती दिल्यानुसार या मार्गावर सदर कवच उपलब्धच नव्हते. दोन रेल्वेंची धडक रोखण्यासाठी मार्च २०२२ साली ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन प्रणालीची चाचणी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतली होती. एटीपीप्रणालीला रेल्वे अपघातांपासून बचाव करणारे 'कवच' म्हटले जाते. रेल्वेच्या रिसर्च डिझाईन ॲण्ड स्टॅण्डर्ड ऑर्गनायझेशनने (आरडीएसओ) विकसित केलेली कवच संरक्षणप्रणाली स्वदेशी असून भारतीय रेल्वेने या तंत्रज्ञानाचा स्वीकार केलेला आहे. या प्रणालीवर २०१२ पासून काम सुरू झाले होते. ही प्रणाली विकसित करून रेल्वे अपघातांची संख्या शून्यावर आणण्याचे भारतीय रेल्वेचे ध्येय आहे. या प्रणालीची पहिली चाचणी २०१६ साली करण्यात आली होती. त्यानंतर त्यात आणखी सुधार करून २०२२ साली वैष्णव यांनी त्याची पुन्हा सुरुवात केली. कवचप्रणालीनुसार लोको पायलट वेगमर्यादेनुसार मेल-एक्स्प्रेस गाड्यांवर नियंत्रण ठेवू शकला नाही, तर कवचप्रणाली कार्यरत होऊन रेल्वे गाडीतील ब्रेक यंत्रणा सक्रिय होते आणि तात्काळ गाडी थांबते. यामुळे समोरासमोर येणाऱ्या किंवा मागून येणाऱ्या गाड्यांची टक्कर टळते. रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीवर थेट निरीक्षण ठेवणे, रेल्वे फाटकाजवळून जाताना स्वयंचलित शिटी वाजणे, आपत्कालीन परिस्थितीत संदेश देणे, लाल सिग्नल ओलांडण्यापासून रोखण्याचे काम ही कवच यंत्रणा करते. एखाद्या मार्गावर, रेल्वे गाडीत, रूळ आणि सिग्नलमध्ये ही यंत्रणा बसविण्यात येते. एकाच ट्रॅकवर धावणाऱ्या दोन वेगवेगळ्या रेल्वेंवर तंत्रज्ञानाद्वारे नजर ठेवणे आणि त्यांना एकमेकांच्या हालचालींबाबत संदेश पोहोचवणे, हे या प्रणालीचे मुख्य काम आहे. जर एखादी रेल्वे चुकून सिग्नल तोडून पुढे निघाली, तर त्याच मार्गावरील इतर रेल्वे पाच किमी अंतरावर आपोआपच थांबविल्या जातात. म्हणून या यंत्रणेला 'कवच' असे समर्पक नाव देण्यात आलेले आहे. दुर्दैवाने भारतात सर्वच ठिकाणी ही यंत्रणा अद्याप बसविण्यात आलेली नाही. राजकारण बाजूला ठेवून राज्यांनी या प्रणालीचा विचार करण्याची गरज आहे.

## राजकीय




**२८ मे रोजी, अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेल्या नवीन संसद भवनाचा उद्घाटन समारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. संसदीय लोकशाहीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद व्हावी, असा तो क्षण होता. देशातील कोट्यवधी जनतेने हा सोहळा टीव्हीच्या पडद्यावर बघितला. नवीन संसद भवनाने 'माझी संसद, माझा अभिमान' अशी चेतना प्रत्येक भारतीयाच्या मनात निर्माण झाली. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत ज्यांनी द्रौपदी मुर्मू यांना विरोध केला, तेच त्यांना संसद भवनाच्या उद्घाटनाला का बोलावले नाही? असा प्रश्न विचारत होते. पण अशा विरोधाकडे सरकारने लक्षही दिले नाही.**

नवीन संसद भवनाचे उद्घाटन आणि त्याला काँग्रेससह एकवीस पक्षांकडून झालेला विरोध हा राजकारणातील मोठा विषय ठरला. पण याच मे महिन्यात एनडीए (नॅशनल डेमोक्रॅटिक अलायन्स) म्हणजेच भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २५ वर्षे पूर्ण झाली. मोदींची जागतिक लोकप्रियता व भाजपची गेल्या ९ वर्षांतील लक्षणीय भरारी यांच्या वलयात एनडीएचा रौप्य महोत्सव मात्र झाकोळला गेला.

एनडीएची सुरुवात सन १९९८ मध्ये झाली. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी यांच्या उत्तुंग व सर्वसमावेशक नेतृत्वावर विश्वास ठेऊन दोन डझन पक्ष एनडीएमध्ये टप्प्याटप्प्याने सामील झाले. आज केंद्रात व १४ राज्यांत एनडीए सत्तेवर आहेच. पण गेल्या २५ वर्षांच्या प्रवासात एनडीएतील अनेक पक्ष वेगवेगळ्या दिशेला निघून गेले, हे वास्तव आहे. एनडीए म्हणजे भारतीय जनता पक्षाबरोबर वैचारिक सूर जमलेली राजकीय आघाडी आहे. आघाडी किंवा युतीमध्ये सर्व मित्रपक्ष सदा सर्वकाळ एकत्र राहतील, अशी अपेक्षा करणेही चुकीचे आहे. काही मित्र रुसून किंवा मतभेद झाल्याने सोडून जातात, तर काही नवे मित्र साथ देण्यासाठी पुढे येतात. संसारात भांड्याला भांडी आपटतात, तसे एनडीएमध्ये अनेकदा घडले. सन २००४ ते २०१४ या काळात केंद्रात काँग्रेसप्रणीत यूपीए (युनायटेड प्रोग्रेसिव्ह अलायन्स) सत्तेवर होती. जसा नरेंद्र मोदींचा राष्ट्रीय क्षितीजावर उदय झाला, तसे एनडीएमध्ये येण्याची अनेकांना घाई दिसून आली. पुढे काही मतभेदांमुळे अनेकजण एनडीएला सोडून गेले. पण एनडीएच्या प्रवासात भाजपचा विस्तार करण्याचे ध्येय नरेंद्र मोदी किंवा अमित शहा यांनी कधी बाजूला ठेवले नाही.

दि. २६ मे रोजी मोदी सरकारला ९ वर्षे पूर्ण झाली. १५ मे रोजी एनडीएच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाली. एनडीएचा रौप्य महोत्सवी सोहळा साजरा झाला नाही. एनडीएच्या रौप्य महोत्सवी वर्षाला प्रसिद्धीही दिली गेली नाही. काँग्रेसला केंद्रात सत्तेपासून दूर ठेवण्यात आणि भाजपला केंद्राची सत्ता मिळवून देण्यात एनडीएचा मोठा वाटा आहे.

१९९६ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजप हा सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आला. पण या पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. शिवसेना हा भाजपचा पहिला मित्रपक्ष. १९८४ मध्ये भाजपने शिवसेनेला बरोबर घेऊन महाराष्ट्रात निवडणूक लढवली होती. पण सर्वात मोठा पक्ष म्हणून १९९६ मध्ये केंद्रात सरकार स्थापन करण्याची संधी मिळेपर्यंत भाजपने कोणाही पक्षांबरोबर युती केलेली नव्हती. १९९६ मध्ये भाजपचे १६१ खासदार निवडून आले होते. काँग्रेसकडे १४० खासदार होते, तेव्हा शिवसेना वगळता भाजपकडे मित्रपक्ष म्हणून येण्याचे फारसे कोणी धाडसही करीत नव्हते. अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली पण बहुमताचा आकडा गाठणे शक्य नसल्याने अवघ्या १३ दिवसांत हे सरकार कोसळले.

१९९८ मध्ये एनडीएची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्यांदा सरकार स्थापन झाले. त्यावर्षी झालेल्या निवडणुकीत भाजपचे १८२ खासदार निवडून आले होते. एनडीएमधील मित्रपक्षांच्या मिळून खासदारांची संख्या २६१ होती. तरीही २८२ बहुमताची संख्या गाठता येत नव्हती. त्याच वेळी तेलुगू देशमने वाजपेयी सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला व एनडीए सरकारला बहुमताची संख्या पार पाडणे शक्य झाले. एनडीएमध्ये शिवसेना (महाराष्ट्र), तृणमूल काँग्रेस (पश्चिम बंगाल), अण्णा द्रमुक (तामिळनाडू), बिजू जनता दल (ओरिसा), शिरोमणी अकाली दल (पंजाब), हरयाणा विकास पार्टी (हरयाणा), समता पार्टी (बिहार व उत्तर प्रदेश) असे प्रमुख प्रादेशिक पक्ष सामील झाले होते.

१९९९ मध्ये अण्णा द्रमुकने एनडीए सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि सरकारने बहुमत गमावले. वाजपेयी सरकार पुन्हा कोसळले. त्यानंतर मात्र १९९९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर तिसऱ्यांदा वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार स्थापन झाले व ते पाच वर्षे चालले. सन २००४ पर्यंत एनडीएची जबाबदारी वाजपेयींनी समर्थपणे संभाळली. नंतर २००४ ते २०१४ पर्यंत एनडीएचे चेअरमन म्हणून अडवाणी यांनी काम पाहिले. २०१४ नंतर केंद्रात मोदी सरकार आल्यापासून एनडीएची जबाबदारी चेअरमन म्हणून अमित शहा यांच्याकडे आहे. वाजपेयी-अडवाणी यांच्या काळात एनडीएचे निमंत्रक म्हणून जॉर्ज फर्नांडिस यांच्याकडे जबाबदारी होती. गेल्या ९ वर्षांत एनडीएचे निमंत्रकपद रिक्त आहे.

सन २०१३ मध्ये नरेंद्र मोदी यांना भाजपने पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून घोषित केले, तेव्हा एनडीएमध्ये २३ घटक पक्ष होते. भाजपच्या बरोबर तेलुगू देशम, शिवसेना, डीएमडीके, अकाली दल, एमडीएमके, पीएमके, लोकजनशक्ती, राष्ट्रीय लोक समता पार्टी, अपना दल, हरयाणा जनहित काँग्रेस, अखिल भारतीय एनआर काँग्रेस, स्वाभिमानी पक्ष, आरपीआय (आठवले), राष्ट्रीय समाज पक्ष, रिवोल्युशनरी सोशालिस्ट पार्टी, केरळ काँग्रेस, नॅशनल पीपल्स पार्टी, नागा पीपल्स फ्रंट, मिझो नॅशनल फ्रंट, असे पक्ष होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपनेच स्वतःचे २८२ खासदार निवडून आणले. एनडीएचे सर्व मिळून ३३६ खासदार विजयी झाले. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. देशात आज १४ राज्यांमध्ये एनडीएचे सरकार आहे.

केंद्रात राजकीय स्थिरता असावी म्हणून भाजपने एनडीएचे सरकार असताना आपल्या अजेंडातील महत्त्वाचे मुद्दे काही काळ बाजूला ठेवले होते. रामजन्मभूमी मंदिर, जम्मू- काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७०वे कलम रद्द करणे, समान नागरी कायदा हे मुद्दे एनडीएतील अनेक घटक पक्षांना मान्य नव्हते. एनडीएमधील घटक पक्षांना संभाळणे ही मोठी तारेवरची कसरत असायची. निमंत्रक असलेले जॉर्ज फर्नांडिस हे एनडीएसाठी संकटमोचक म्हणून काम करीत असत. ममता बॅनर्जी आणि जय ललिता यांना समजावणे हे मोठे आव्हान असायचे. ममता, समता, माया व जया यांनी वाजपेयी काळात अनेकदा पेच निर्माण केले. भाजपकडे २०१४ पासून स्पष्ट बहुमत आहे. अन्य पक्षांवर अवलंबून सरकार चालविण्याची भाजपला गरज नाही. अनेक पक्ष एनडीए सोडून गेले. पण अनेक पक्ष आजही भाजपबरोबर नांदत आहेत. बिगर काँग्रेसचे पंतप्रधान म्हणून पाच वर्षे सरकार चालविणारे वाजपेयी हे पहिले पंतप्रधान ठरले. एनडीएच्या काळातच गोध्रा हत्याकांड व गुजरात दंगल घडली व कारगील युद्धही झाले. अशा अनेक कठीण प्रसंगांना एनडीएने तोंड दिले. २००४ मध्ये भाजपने दिलेली इंडिया शायनिंग ही घोषणा प्रभावी ठरली नाही, पण मोदींनी दिलेला सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' हा मंत्र जनतेने स्वीकारला आहे.

**- सुकृत खांडेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# पर्यावरण दिनाचे महत्त्व

आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघात (युनो) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program (UNEP ) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो.

दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर होस्ट करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते. गतवर्षी म्हणजे २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही गतवर्षीची थीम होती. यावर्षी म्हणजे २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही यावर्षीची थीम आहे. या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली जाणार आहे. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करून मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

## जन्म हा अखेरचा

# प्राणानुग्रहस्थल - १



प्रसन्नचित्ताने श्रीगुरु ज्ञान देतात तेव्हा ती गुरुकृपा असते. वेदादी सद्ग्रंथांच्या ग्रंथकारांची कृपा म्हणजे शास्त्रकृपा, वेदकृपा होय. याबरोबरच आपल्यावर मनाची कृपा हवी. ती नसेल तर सर्व व्यर्थ होईल. मनाची कृपा नसेल, मन स्थिर होत नसेल तर गुरु बिचारा काय करीत? ईश्वर तरी काय करणार? वेदांतात जशी चार प्रकारची कृपा वर्णिली आहे, त्याप्रमाणे सिद्धांतात तीन प्रकारची कृपा सांगितली आहे. शरीरकृपा, इंद्रियकृपा व प्राणकृपा. अधिकात अधिक काळ शरीर स्थिर असेल तर समजावे की शरीरकृपा होत आहे. शरीर म्हणजे इंद्रियांचा, अवयवांचा समूह. शरीर स्थिर बसेल पण इंद्रियांचे काय? ध्यानासाठी डोळे बंद करुन पहावे आणि ते किलकिले राहिले तर? तर इंद्रियांची कृपा झाली नाही असे समजावे. म्हणून कायानुग्रहानंतर इंद्रियानुग्रह सांगितला आहे. इंद्रियानुग्रह सांगताना काल प्राणानुग्रहाचा उल्लेख झाला. शरीर आणि इंद्रियांप्रमाणे प्राणाने देखील भगवंताची पूजा केली पाहिजे. श्वासासोबत मंत्राचा सहयोग झाला की प्राणाद्वारे भगवंताची अर्चना सुरु होते. केवळ वाणीने मंत्रजप करणे हा जपाचा मध्यम प्रकार होय. वाणी, मन आणि प्राण हे तिन्ही मिळून जर मंत्रजप करु लागते तर तो उत्तम जप होय. वाणीने जप करताना त्याच्यासोबत प्राण जुळावा आणि मंत्राच्या अर्थाचे मनाने चिंतन करावे हा खरा मंत्रजप होय.

कालच्या आशीर्वचनात आपण ऐकले आहे की, कुंडलीत तनुस्थान, धनस्थान, सहजस्थान, मातृस्थान, संततिस्थान, शत्रुस्थान, जायास्थान, मृत्युस्थान, भाग्यस्थान, पितृस्थान, लाभस्थान आणि व्ययस्थान अशी काही स्थाने असतात. त्या त्या स्थानी असलेल्या ग्रहांचा प्रभाव मानवी आयुष्यावर होतो. ग्रह अनुकूल नसतील तर आपल्याला सुख मिळत नाही. संपत्ती, भाऊबंद, संतती इत्यादीपासून सुख मिळत नाही. या प्रतिकूल ग्रहांना बदलून अनुकूल ग्रहांचा समावेश कुंडलीत करता येत नाही. कुंडलीतील ग्रह बदलण्याचे सामर्थ्य आपल्याजवळ असते. आपणच आपले भाग्यविधाता असतो. काल, कर्म, माया यावर भगवद्भक्तीने विजय मिळविता येतो, असे कन्नड कवी निजगुण शिवयोगी यांनी म्हटले आहे. नामजप हा भगवद्भक्तीचा अत्यंत सोपा उपाय आहे. कुंडलीतील बारा स्थानांच्या शुद्धीसाठी तेरा कोटी जप करावा असे सांगितले आहे. एखाद्याला एवढा जप करणे शक्य नसेल तर त्याने तेरा लक्ष जप करावा. तेही शक्य नसेल तर तेरा हजार, तेराशे देखील करता येतो. पण त्या मानाने लाभ कमी होतो. **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# नैतिक भूमिकेवर राजीनामा द्यायला पाहिजे काय?

ओरिसा राज्यात २ जून रोजी रेल्वेचा मोठा अपघात होऊन जवळपास २८८ लोकांचा मृत्यू झाला व १००० च्या आसपास लोक जखमी आहेत. हा अपघात का झाला? याचिका चौकशी चालू आहे व त्याचे कारण या चौकशीत कळेल. या अपघाताची नैतिक जबाबदारी घेऊन रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी अनेकांनी केली आहे.

देशातील रेल्वे अपघातामुळे राजीनामा दिलेले व तो राजीनामा स्वीकारलेले दोन रेल्वेमंत्री आहेत. पहिले लाल बहादूर शास्त्री व दुसरे आत्ताचे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार. १९५६ च्या ऑगस्ट महिन्यात आंध्रप्रदेशात रेल्वेचा मोठा अपघात झाला होता. त्या अपघातात ११२ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यावेळेस लाल बहादूर शास्त्री यांनी आपला राजीनामा त्यावेळचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडे सोपविला होता, पण त्यांनी तो स्वीकारला नाही. यानंतर नोव्हेंबर महिन्यात तामिळनाडूमध्ये रेल्वे अपघात होऊन त्यात १४४ लोकांचा मृत्यू झाला. त्यावेळेस शास्त्रींनी आपला राजीनामा दिला व तो स्वीकारला गेला. सन १९९९ मध्ये आसाम राज्यात रेल्वेचा मोठा अपघात होऊन त्यात २९० लोकांचा मृत्यू झाला. त्यावेळेस नितीश कुमार यांनी आपला राजीनामा दिला होता व स्वीकारला गेला.

२००० साली ममता बॅनर्जी रेल्वे मंत्री असताना त्यांनी आपला राजीनामा पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्याकडे सोपविला होता पण तो स्वीकारला गेला नाही. सुरेश प्रभू रेल्वेमंत्री असताना २०१७ सालीकानपुर येथे रेल्वे अपघात झाला होता, त्यावेळेस १५० लोक मृत्युमुखी पडले होते. त्यावेळी त्यांनी राजीनामा दिला पण त्यांना व्यापार खाते देण्यात आले. देशातील सर्वात मोठा रेल्वे अपघात १९८१ साली झाला होता. त्यामध्ये ८०० जणांचा मृत्यू आला होता.

१९९५ साली उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद येथे झालेल्या अपघातात ३५० जणांचा मृत्यू झाला होता. १९९९ साली गैसाल येथे आसाम राज्यात झालेल्या अपघातात ३०० जणांचा मृत्यू झाला होता. आताच्या अपघातात २८८ लोक मृत्युमुखी पडले आहेत व देशातील मृत्यूंचे आकडे पाहिल्यास हा चौथा मोठा अपघात आहे.

रेल्वे अपघात झाल्यानंतर सर्वच रेल्वेमंत्र्यांनी राजीनामे दिलेले नाहीत. आत्तापर्यंत केवळ दोनच मंत्र्यांनी राजीनामे दिलेले स्वीकारले आहेत. तथापि अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देणे योग्य ठरेल असे वाटते.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# - संतविचार -



डॉ. देविदास गुरव, सोलापूर

**'जेथ अमृताचेनि पाडें । मुळेंही सकट गोडें**
**जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ।। ६/७३**
**पाउला पाउला उदकें । वर्षाकाळीही परिचोखें**
**निर्झरें का विशेखें । सुलभे जेथ'।।**

ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात योगाभ्यासाकरिता निसर्ग कसा सहाय्यक ठरतो, नैसर्गिक स्थान कसे असावे याचे वर्णन केले आहे.ज्ञानेश्वर माऊलींनी सृष्टीतील, वृक्षातील सुंदरता मधुरता हळूवार उलगडली आहे. सर्वच संतांचा परमानंद म्हणजे भगवंताचे दर्शन घडणे होय नि हे दर्शन त्यांना निसर्गातील वृक्ष, वेली, पशु, पक्षी छोट्या गोष्टींतही घडतो. संत हे त्रिकालज्ञानी होते. पर्यावरणाचे महत्व त्यांना ज्ञात होते. संत तुकोबांना हेच सांगायचे आहे. त्यांची पुढील रचना सुप्रसिद्ध व सर्वश्रुत आहेच.

**'वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे**
**पक्षीही सुस्वरे आळविती**
**तेणे सुखे रूचे एकांताचा वास**
**नाही गुणदोष अंगा येत**
**आकाश मंडप पृथिवी आसन**
**रमे तेथे मन क्रीडा करी**
**कथा कमंडलू देहउपचारा**
**जाणवितो वारा अवसरू**
**हरिकथा भोजन परवडी विस्तार**
**करोनि प्रकार सेवू रुची**
**तुका म्हणे होय मनासी संवाद**
**आपुलाचि वाद आपणासी'**

संत तुकोबांनी वरील रचनेतून निसर्गाशी घनिष्ट नाते असल्याचे प्रतिपादन केले आहे. निसर्ग हा जन्मापासून अंतिम क्षणापर्यंत जिवलग सखा आहे. ते म्हणतात, 'वृक्ष, वेली, विविध वनस्पती, वनचर, पक्षी हे आमचे सोयरे आहेत. एकांतात त्या सर्वांचा सहवास खूप प्रिय वाटतो. आकाशाच्या मंडपाखाली आणि पृथ्वीच्या आसनावर बसून आम्हाला मनसोक्त क्रीडा (भक्ती) करता येते. सोबत समजूत घालणारा वारा आहे. निसर्गाच्या सानिध्यात आम्ही हरिकथेच्या भोजनाचा आस्वाद घेऊ शकतो. मनाशी संवाद करू शकतो. निसर्ग मानवाचा सच्चा सोबती आहे. जीवनाच्या प्रत्येक वळणावर त्याची साथ संगत

## ।। वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे ।।

लागते. त्याशिवाय आपले जगणे, 'जगणे' रहात नाही. तुकोबा तुम्हा-आम्हाला हेच समजावत आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात, जनांपासून दूर विजनवासात माणसाचे मन शांत होते. माणूस स्वतःशी संवाद साधू शकतो. आजच्या प्रचंड धावपळीच्या आणि कोलाहलाच्या परिस्थितीत आपण स्वतःशी संवाद साधू शकत नाही. आपले मन मोकळे करू शकत नाही. त्यामुळे मानसिक विकृती, ताण-तणाव व मनोविकारांना मनुष्य बळी पडतो आहे. आज समाजात मनोरुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. तुकाराम महाराजांच्या काळात आजच्यासारखी परिस्थिती नव्हती. तरीही निरोगी मनासाठी, भक्तितील एकाग्रतेसाठी वनांची, पशुपक्ष्यांच्या सहवासाची आवश्यकता कशी असते ते त्यांनी या अभंगातून स्पष्ट केले आहे. वनस्पती विज्ञानाला भक्तीची जोड देऊन, वृक्ष, पशू-पक्षी, नदी, ओढे, डोंगरदऱ्या यात त्यांनी पांडुरंगाचे दर्शन घडवले. एवढेच नव्हे तर पर्यावरणाचे संतुलन व निसर्गाचे संवर्धन व्हावे याकरिता त्यांच्यातील देवत्व अधिक दृढ केले. त्यांच्याशी नाते जोडून घेतले.निसर्ग आणि आपल्यात किती सख्य असावे, किती संवेदनशील असावे याचे संतांनी आचरणातून पदोपदी जाणीव करून दिली आहे. नामदेवांनी 'जैसा वृक्ष नेणे' या अभंगात संतांना वृक्षांची उपमा दिली यावरूनच आपली संत मंडळी वृक्ष-वल्लीच्या बाबतीत जागरूक होती हे लक्षात येते.आज परिस्थिती विपरीत बनली आहे. नव्हे मानवाने ती बनवली आहे. भारतीय संस्कृतीत महत्वाचे स्थान असलेले लिंब, पिंपळ, उंबर, चिंच, वड अशी असंख्य निसर्ग संवर्धक वृक्ष आज संपत चालली आहेत. स्वतःच्या मतलबापोटी आधुनिकतेच्या नावाखाली रोज 'आधारवडांची', वृक्षांची कत्तल होत आहे. म्हणूनच आज सारी मानवजात 'प्राणवायूकरिता तरसत आहेत. 'जेव्हा आम्ही तोडतो एकेक झाड तेव्हा आमचा संपत जातो एकेक श्वास' ही अनुभूती श्वासागणिक प्रत्ययास येत आहे. आमच्या संतांनी वृक्षांचे, वनचरांचे जीवनातील महत्व ओळखले नि त्वरित त्याची जाणीवही करून दिली. परंतु स्वतःला सुशिक्षित, बुद्धीवंत आणि प्रगत समजणारे आपण, याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. म्हणून त्याचे फळ व दुष्परिणाम आज भोगावे लागत आहे. सध्या निसर्ग नियमानुसार आचरण करून, पर्यावरणांचे संरक्षण करण्याची वेळ आली आहे. 'प्राणवायू' हवा असेल तर वृक्षांचे 'प्राण' वाचवणे गरजेचे झाले आहे. हाच आपला परमार्थ आहे. शेकडो वर्षापासून ते आजतागायत संतवाणीतून प्रवाहित होणारे 'परमार्थाचे प्राणतत्व' आज जमेल तसे जपण्याचा व ते आत्मसात करायला काय हरकत आहे?



सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## टास्क पूर्ण केल्यास जास्त रक्कमेचे आमिष दाखवून फसवणूक

**सोलापूर :** सोशल मीडियावरून संपर्क साधून टास्क पूर्ण केल्यास जास्त रक्कम मिळेल, असे आमिष दाखवून १६ लाख २२ हजार रुपये गुंतवण्यास सांगितले. ती रक्कम परत न दिल्याप्रकरणी तिघांवर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी विनायक नरसिंग जोशी (४१,रा.रामदेवबाबा नगर,वसंत विहार) यांनी फिर्याद दिली आहे.जोशी यांना आरोपींनी सोशल मीडिया पमधून संपर्क साधला.यात आरोपींनी संगनमत करून फिर्यादी जोशी यांचा विश्वास संपादन करून घेतले.शिवाय त्यांना क्रॉस करन्सी बिटकाइनमध्ये रक्कम गुंतवण्यास भाग पाडले. यात जोशी यांनी १६ लाख २२ हजार रुपये गुंतविले. शिवाय त्यांना गुंतवलेली रक्कमेपोटी २१ लाख ५४ हजार ४०० रुपये व इनकम टॅक्सची रक्कम सहा लाख ४६ हजार ३२० रुपये असे एकूण २८ लाख ७२० रुपये मिळणार असल्याचे सांगितले. पण ती रक्कम न मिळवून देता आरोपींनी त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी तीन सोशल मीडिया खातेधारकावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राजेंद्र बहिरट हे करत आहेत.

## हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळवली

**सोलापूर :** न्यू पाच्छा पेठ येथील राघवेंद्र टॉवर येथे हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३. सीएच.६८७४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २७ मे रोजी रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी यादगिरी नरसय्या नराल (वय-५७,रा.न्यू सुनील नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेच्या पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शेख हे करीत आहेत.

## पार्किंगमधून मोटारसायकल लंपास

**सोलापूर :** अंबाल टॉवरच्या पार्किंगमध्ये हॅण्डल लॉक करून ठेवलेली मोटरसायकल क्र.एमएच.१३.बीएफ.४९०१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १८ ते १९ मे दरम्यान घडली. याप्रकरणी लक्ष्मीनारायण उपलंची (वय-५६,रा.गांधीनगर, अंबाल टॉवर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

## माढा परिसरात दोन घरफोड्या

**सोलापूर** :माढा तालुक्यातील बेंबळे आणि कन्हेरगाव परिसरात चोरट्यांनी चार ठिकाणी धाडसी घरफोड्या केल्या. त्यापैकी दोघांच्या घरातून रोख रकमेसह ५ लाख ९० हजाराचे दागिने चोरीस गेल्याची नोंद टेंभुर्णी पोलिसात झाली आहे .या प्रकारामुळे माढा तालुक्यातील ग्रामस्यात भीतीचे वातावरण पसरले आहे .

बेंबळे (ता.माढा ) येथील प्रशांत श्रीमंत अवताडे यांच्या घरातून चोरट्याने रोख रकमेसह २ लाख २५ हजाराचे दागिने पळविले. ही चोरी शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली .अवताडे यांच्या बंगल्यातील उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने बेडरूमच्या कपाटामधून २५ हजार रुपये रोख आणि ५४ ग्रॅम सोन्याचे दागिने पळवले. तसेच त्यांच्या घरापासून काही अंतरावर राहणाऱ्या नवनाथ गोडसे यांच्या घरात देखील चोरट्यांनी हा प्रकार केला. अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार पठाण पुढील तपास करीत आहेत.

## विविध ठिकाणी अपघातात दोघेजण ठार

**सोलापूर :** करमाळा आणि उस्मानाबाद परिसरात दुचाकी घसरून झालेल्या अपघातामधील दोघा जखमींचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मृत्यू झाला . गणेश मंचिक सुरवसे (वय २२ रा. उंबरेकोटा जि . धाराशिव) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो काल शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास कळंब ते धाराशिव असा प्रवास करीत होता . गोविंदपुर येथील पेट्रोल पंपाजवळ दुचाकी घसरल्याने तो गंभीर जखमी झाला होता . त्याला ढोकी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. तो शनिवारी रात्री मयत झाला .अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे . दुसरा अपघात झरे (ता.करमाळा ) येथे आज रविवारी सकाळच्या सुमारास घडला. रवींद्र सोपान शिंदे (वय ४५ रा.कुंभेज ता. करमाळा) असे मयताचे नाव आहे. आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते झरे येथून कुंभेज येथे आपल्या घराकडे निघाले होते. झरे फाट्याजवळ दुचाकी घसरल्याने ते गंभीर जखमी झाले.

## ऊकळत्या तेलाने भाजलेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** :जेजुरी (जि.पुणे ) येथे हॉटेल मधे काम करीत असताना कढईतील उकडते तेल अंगावर पडून भाजून जखमी झालेल गणेश श्रीकृष्ण अरगळे (वय ३३ रा.शिवरत्न नगर, पंढरपूर ) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी सकाळी मरण पावला.तो २७ मे रोजी दुपारच्या सुमारास जेजुरी येथील हॉटेलमध्ये काम करताना भाजला होता. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून २ जून रोजी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते . उत्तरादरम्यान तो रविवारी मयत झाला . अशी प्राथमिक नोंद सिविल चौकी पोलिसात झाली आहे .

## निधन वृत्त

### लक्ष्मण लवटे



**सांगोला :** महूद बु. येथील भुसार मालाचे व्यापारी व सांगोला साखर कारखान्याचे संस्थापक संचालक लक्ष्मण गणपत लवटे यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले त्यांचे पश्चात एक मुलगा, सून, चार मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. महूद गावचे माजी सरपंच नवनाथ लवटे यांचे ते वडील होत

### उज्वला जोशी



**माढा :** माढ्यातील उज्वला कृष्णाजी जोशी यांचे रविवार दि. ४ जून रोजी सकाळी दुखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८६ वर्षे होते. माढेश्वरी मंदीरालगतच्या हिंदू स्मशानभूमीत सायं. ६ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. माढ्यातील माध्यमिक शिक्षक गणेश जोशी यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात पती, मुलगा आणि दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रवीण शिंदे

**बार्शी :** अभियंता प्रवीण प्रताप शिंदे ( वय ४१ ) (चिंचोली ढेंबरेवाडी) यांचे दि. ३ जून रोजी पहाटे ५ वा. इंदोर येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, वडील असा परिवार आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी विद्यालयाचे वरिष्ठ साधक प्रताप शिंदे यांचे ते पुत्र होत.

## ▶ शाळेच्या पहिल्याच दिवशी

# ७६ हजार मुलांना होणार पाठ्यपुस्तकांचे वाटप

### ▶ ३ लाख १८ हजार पाठ्यपुस्तकांचे वाटप होणार

### ▶ आजपासून बीटनिहाय पाठ्यपुस्तकांचे वाटप

सुराज्य/सोलापूर

**उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा एकदा बुधवार १५ जूनपासून प्रत्यक्षात शाळा सुरू होणार आहेत. मात्र दोन दिवस शिक्षक आणि कर्मचाऱ्यांकडून शाळा पूर्वतयारी करून घेण्यात आली आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत, समग्र शिक्षा विभाग अंतर्गत सोलापूर शहरातील ७५ हजार ७५८ लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी ३ लाख १७ हजार ९८९ पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे अशी माहिती महानगर - पालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासनाधिकारी विठ्ठल ढेपे यांनी दिली.**



इयत्ता १ ली व ८ वी ची मराठी, उर्दू, हिंदी व इंग्रजी माध्यमाच्या तसेच सेमी इंग्रजी माध्यमाच्या पाठयपुस्तकांची एकूण ४ भागांमध्ये विभागणी करुन त्यामध्ये सरावासाठी स्वाध्यायाची पृष्ठे समाविष्ट आहेत. प्रत्येक घटक, पाठ, कविता यानंतर वहीचे एक पान समाविष्ट करून पाठ्य पुस्तकाची बांधणी करण्यात आलेली आहे. उर्वरीत कन्नड, तेलुगु या माध्यमांची इयता १ ली इयता ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी नियमित पाठ्यपुस्तके उपलब्ध करुन दयावयाची आहेत. त्यानुसार सन २०२१-२२ मधील शाळेच्या युडायसप्रमाणे इयता निहाय आणि माध्यम निहाय आपली पाठयपुस्तके खालील वेळापत्रकानुसार घेऊन जायचे आहेत.

सोमवार दि. ५ जून रोजी शहरातील सर्व बीट मधील सर्व मराठी मनापासून शाळा सर्व मनोपाच्या उर्दू शाळांना सकाळी दहा ते दुपारी एक आणि दुपारी तीन ते पाच या वेळेत पाठ्यपुस्तके देण्यात येतील तर सहा जून रोजी सर्व खाजगी उर्दू शाळा सर्व मनपा आणि खाजगी कन्नड शाळा आणि सर्व तेलगू शाळांना पाठ्यपुस्तक उपलब्ध करून देण्यात येतील. शाळा मुख्याध्यापकांनी पर्यवेक्षक मनीष बांगर, संतोष बुलबुले, सुरेश कासार आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रियाज अत्तार यांच्याशी पाठ्यपुस्तकाच्या ठिकाणी संपर्क साधावा.

बीट क्रमांक-१ ते ६ मधील सर्व मराठी माध्यमाच्या आणि सेमी आणि इंग्लिश मीडियमच्या शाळांना सात जून पासून ते १४ जूनपर्यंत सकाळी १०-३० ते दुपारी १ आणि, दुपारी ३ ते ५-३० पर्यंत जोडबसव्वना चौकातील महानगर- पालिका मराठी मुलांची शाळा क्रमांक सहा येथे पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येईल. पुस्तके घेण्यासाठी येताना, शाळा मुख्याध्यापकांनी पुस्तक मागणीचे नोंदणी केलेले पत्र तसेच शाळा मुख्याध्यापकाचा शिक्का घेऊन यावे पुस्तके प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करून विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप करावीत पाठ्यपुस्तके वाटपाच्या सहीचे तक्ते चार प्रतीक तयार करावेत दोन प्रत शालेय दप्तरी ठेवून एक प्रत कार्यालयाकडे द्यावी.आणि एक प्रत त्या - त्या वर्ग शिक्षकाकडे ठेवावी तरी सर्व शाळा मुख्याध्यापकांनी स्वतः उपस्थित राहून पाठ्यपुस्तके ताब्यात घ्यावीत असेही प्रभारी प्रशासनाधिकारी विठ्ठल ढेपे यांनी सांगितले आहे.

## कर्ण बधिरांची पहिली टी-२० क्रिकेट स्पर्धा

सुराज्य/सोलापूर

कर्ण बधिरांची पहिली राष्ट्रीय टी-२० क्रिकेट स्पर्धा सोलापुरात सोमवार पाच जूनपासून सुरू होत आहे.

येथील इंदिरा गांधी स्टेडियम आणि रेल्वे मैदानावर ७ जूनपर्यंत अखिल भारतीय, महाराष्ट्र आणि सोलापूर जिल्हा डेफ अँड डंब असोसिएशनच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत पश्चिम विभागासह पूर्व, दक्षिण, उत्तर व मध्य विभाग असे ५ संघ भाग घेणार आहेत. ही स्पर्धा साखळी पद्धतीने होणार असून गुणपद्धतीवर स्पर्धेचे विजेते व उपविजेते संघ ठरणार आहेत. या स्पर्धेतून वर्ल्ड कप स्पर्धेसाठी भारताचे संभाव्य संघ निवडण्यात येणार आहेत, असे संयोजक श्रीराम घाडगे यांनी कळविले आहे.

## ▶ मोदी सरकारची नऊ वर्षपूर्ती

# अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात विविध कार्यक्रमांचे आयोजन

सुराज्य/अक्कलकोट

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारला सत्तेत येऊन नऊ वर्ष पूर्ण होत आहेत.यानिमित्त अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात ठिकठिकाणी निरनिराळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

यावेळी बोलताना २०१४ मध्ये केलेल्या कामगिरीच्या आधारे जनतेने पुन्हा २०१९ मध्ये भाजपला भरभरून मते देत नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान पदी बसण्याची संधी दिली.यामध्ये मोदी सरकारने सुरु केलेल्या काही महत्वाच्या लोककल्याणकारी योजनांचाही वाटा होता. त्यामुळेच भाजप घराघरात पोहोचली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीवर विरोधी पक्षांनी अनेक प्रश्न उपस्थित केले.पण,आपल्या अनेक योजनांद्वारे ते लोकांमध्ये लोकप्रिय झाले.





नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान म्हणून ९ वर्षे अनेक अर्थाने खूप महत्त्वाची होती. या नऊ वर्षाच्या काळात त्यांनी अनेक निर्णय, अनेक योजना जाहीर केल्या. त्यांच्या मन की बात' या कार्यक्रमाने शंभरी गाठली. त्यातील काही महत्वाच्या योजनांचा त्यांनी आढावा घेतला.पत्रकार परिषदेस तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, माजी पक्षनेता महेश हिंडोळे, अप्पू बिराजदार, उपसभापती सिद्धाराम बाके, प्रदीप पाटील सर, समर्थ नगरचे सरपंच प्रदीप पाटील, मलिकार्जुन आळगी, संदीप राठोड, दयानंद बमनळळी, अनिल पाटील,राम पारतनाळे, प्रकाश पाटील, चंद्रकांत दसले, धनंजय गाढवे, अप्पाशा पुजारी, नागेश कलशेट्टी यांच्या सह भारतीय जनता पार्टी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापालिका शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रशासन अधिकारीपदी विठ्ठल ढेपे

सुराज्य/सोलापूर : शिक्षण विभागाकडील वेतन पथकाचे अधीक्षक विठ्ठल ढेपे यांच्याकडे सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे.



सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर हे सेवानिवृत्त झाल्याने येथील पद रिक्त झाले आहे. त्यामुळे शासनाने शिक्षण विभागाकडील वेतन पथकाचे अधीक्षक विठ्ठल ढेपे यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे. नवी पेठेतील शिक्षण मंडळाच्या कार्यालयात त्यांनी पदभार घेतला. यावेळी प्रभारी प्रशासन अधिकारी ढेपे यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. यावेळी समितीचे गुरुनाथ वांगीकर, माजी नगरसेवक गणेश पुजारी काशिनाथ बिराजदार उपस्थित होते.

## बाळीवेस येथील दुकानाला आग

सुराज्य/सोलापूर

बाळीवेस येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागील बाजूस असलेल्या एका दुकानाला अचानक लागलेली आग अग्निशामक दलाच्या सतर्कतेमुळे विझविण्यात आली. यामुळे पुढील अनर्थ टळला.

रविवारी कस्तुरबा मंडईजवळील स्टेट बँक इंडियाच्या मागील बाजूस मिनी शॉपिंग लाईन आहे. त्यापैकी एका दुकानाला अचानक आग लागली. धुराचे लोट बाहेर येत होते. ते पाहून महापालिकेचे आरोग्य निरीक्षक शेषराव शिरसट यांनी तत्काळ अग्निशामक दलाचे प्रमुख केदारनाथ आवटे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर अवघ्या काही मिनिटातच अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली.

तत्काळ पाणी मारून आग विजवण्यात आली. आरोग्य निरीक्षक शेषराव शिरसट यांचे प्रसंगावधान आणि अग्निशामक दलाच्या सतर्कतेमुळे ही आग विझल्याने पुढील अनर्थ टळला. यावेळी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आणि अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## योगमुद्रा शारीरिक व मानसिक स्वास्थासाठी लाभदायक

सुराज्य/सोलापूर

योग मुद्राचे आपल्या संस्कृतीत अनन्य साधारण असे महत्व आहे. प्रत्येक पूजा पद्धतीत, योगाभ्यास करताना आणि मंत्राचे उच्चारण करताना मुद्रा सहाय्यक ठरतात. तसेच यांचा आपल्या शरीरावर व मनावर सकारात्मक परिणाम होतो, असे प्रतिपादन योग शिक्षिका रश्मी बडवे यांनी केले.

विवेकानंद केंद्र वेदांतीक अप्लिकेशन ऑफ योग अँड मॅनेजमेंट तर्फे योग मुद्रा शिबिराचे शनिवार आणि रविवारी आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान बडवे बोलत होते. तसेच यावेळी विवेकानंद केंद्र जुळे सोलापूरचे नगर संचालक नंदकुमार चितापुरे, योग वर्ग प्रमुख आनंद भंडारे आणि प्रकल्प प्रमुख सुहास देशपांडे उपस्थित होते.

बडवे म्हणाल्या, 'आपला प्रवास नेहमी तमसकडून रजसकडे आणि पुढे रजसकडून सात्विककडे असतो. ऊर्जा साठवून ठेवण्याची जागा ही आपल्या शरीरात आहे. पंच प्राण मुद्रांमध्ये प्राण, सामान, व्यान, उदान आणि अपान मुद्रा आहेत. या मुद्रांचा दररोज अवलंब केल्यास शरीर रोग मुक्त होतो. इडा, पिंगला आणि सुशुना या प्रमुख नाड्या असून एकूण ७२ हजार नाड्या आपल्या शरीरात आहेत. तसेच यावेळी आलेल्या लोकांकडून काही मुद्रांचा सरावही करून घेण्यात आला.'

दरम्यान भंडारे म्हणाले, सांख्यकारिका हा पाया असून यातूनच योगाचा उदय झाला आहे. बाह्य योग आणि अंतरंग योगाला जोडण्याचा काम शवासन करतो. उद्या रविवारी अधिकाधिक जण उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी केले.

## ब्रिजधाममध्ये 'मर्मबंध नाते सुरांशी' हिंदी गीतांचा कार्यक्रम

सुराज्य/सोलापूर

सोरेगाव येथील ब्रिजधाम वृद्धाश्रमात पुण्याच्या जया कर्णिक यांचा 'मर्मबंध नाते सुरांशी' हा हिंदी गीतांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कर्णिक यांच्या टीमने सादर केलेल्या प्रत्येक गीताला उपस्थित ज्येष्ठ नागरिक व श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.



यावेळी ब्रिजमोहन फोफलिया यांनी संगीताविषयी विचार व्यक्त करताना संगीत सर्व शक्तिशाली आहे. लोकांना अनेक समस्या आहेत, त्रास आहे, त्यात जर संगीताची साथ मिळाली तर जीवन आनंदमय होते. संगीत रसाने भरलेले एक शक्तिवर्धक टॉनिक आहे. संगीत साधूंना, देवी-देवतांसह मानव जातीला अफाट प्रिय आहे.कुठलाही कार्यक्रम संगीताशिवाय अपुरे आहे.

यावेळी गायक जया कर्णिक, श्रीनिवास ठोंबरे, गायत्री पुरकर, सुचेता ठोंबरे, लीना चिटणीस, राजीव अथानी, यशवंत चंदनशिवे यांनी दिल सच्चा और चेहरा झूठा, आधा है चंद्रमा रात आधी, मेरे मन की गंगा और तेरे मन की जमुना, पुकारता चला हु मै, ये देश है वीर जवानो का,अशी एका पेक्षा एक अविस्मरणीय गीते सादर केली . याला उपस्थित जेष्ठ नागरिक ,श्रोत्यांनी दाद दिली . या सर्व गायक कलाकारांचा ब्रिजमोहन फोफलिया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

# शिवचरित्राकडे डोळसपणे पाहण्याची गरज : डॉ. फाळके

सुराज्य/सोलापूर

**श्री शिवछत्रपतींनी आपले आयुष्य राष्ट्राच्या कल्याणासाठी खर्च केले. शिवचरित्राकडे डोळसपणे पाहण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवचरित्र अभ्यासक डॉ. केदार फाळके यांनी केले. श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अर्थात हिंदूसाम्राज्य दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेचे उद्घाटन शनिवारी शिवस्मारक सभागृहात झाले.**

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प शनिवारी शिवचरित्र अभ्यासक डॉ. केदार फाळके यांनी 'शिवचरित्र सरंजामशाहीकडून स्वातंत्र्याकडे विस्तारित जाणारी 'क्षितिजे' या विषयावर गुंफले. भारतमाता आणि छत्रपति श्री शिवाजी महाराज यांच्या पूजनाने व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले.

यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक राजेंद्र काटवे, सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी उपस्थित होते.



डॉ. फाळके म्हणाले, शिवकालीन शेतीव्यवस्था, व्यापार, करव्यवस्था, चलन, आरमार, न्यायदान या सर्व बाबी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. प्रशासन चालवताना प्रत्येक बाब लोकहिताची असण्यावर छत्रपति श्री शिवरायांचा भर होता. केवळ महसूल गोळा करत सैन्य बाळगून राज्य करणे ही परंपरा मोडीत काढून श्री शिवछत्रपतींनी जनतेच्या सर्वांगीण कल्याणाचे राज्य निर्माण केले.

सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी केलेले कार्य, राष्ट्राला मिळवून दिलेले स्वातंत्र्य आणि श्री शिवछत्रपतींचे हृदय जाणून घेण्यासाठी त्यांच्या अस्सल पत्रांचे वाचन करणे आवश्यक आहे, असेही डॉ. फाळके यांनी सांगितले.

शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी चव्हाण यांनी सूत्रसंचालन तर शिवस्मारकचे कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

### सोलापुरातील लिंगायत मंडळींवर आदिलशहाचा कर

सोलापुरात आदिलशाहींचे राज्य असताना ज्याप्रमाणे औरंगजेबाने हिंदूंवर जिझिया कर लावला त्याप्रमाणे आदिलशहाने सोलापूरातील लिंगायत मंडळींवर गणाचारी, आदीखुर्शी असे कर लावल्याचे पुरावे उपलब्ध असल्याचे डॉ. फाळके म्हणाले.

# धर्मांतरबंदी कायदा लागू केल्यास विधिमंडळाला घेराव घालू : प्रा. कांबळे

✔ सुराज्य/सांगोला

**धर्मांतर करणे, धर्माचे आचरण करणे, धर्माचा प्रचार करणे हा भारतीय संविधानाने मूलभूत हक्क दिला आहे. असे असताना कथित लव्ह जिहादच्या नावाखाली राज्य सरकार महाराष्ट्रात धर्मांतर बंदी कायदा लागू करण्याचा प्रयत्न करत आहे. या कायद्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. संविधानातील मूलभूत तत्वांची पायमल्ली करून सरकारने हा कायदा लागू केल्यास प्रसंगी विधिमंडळाला घेराव घालू, असा इशारा सेक्युलर मुव्हमेंटचे अध्यक्ष प्रा गौतमीपुत्र कांबळे यांनी दिला.**



सेक्युलर मुव्हमेंट आणि सेक्युलर आर्ट मुव्हमेंट महाराष्ट्रतर्फे सांगोला (जि. सोलापूर) येथे शनिवारी संविधानिक धार्मिक स्वातंत्र्य हक्क परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा. कांबळे बोलत होते.

परिषदेचे उद्घाटन प्रा. डॉ. भरत नाईक (कोल्हापूर, जनरल सेक्रेटरी - सेक्युलर मुव्हमेंट) यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी भरत शेळके (कार्याध्यक्ष - सेक्युलर मुव्हमेंट, तथा माजी सहायक पोलिस आयुक्त) होते. सेक्युलर मुव्हमेंटचे अध्यक्ष प्रा. गौतमीपुत्र कांबळे, ज्येष्ठ पत्रकार तथा लोकसत्ताचे सहसंपादक मधु कांबळे, प्रा. डॉ. जी.व्ही. सरतापे, पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख, पत्रकार डॉ. बाळासाहेब मागाडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन ड. सुनील जगधने यांनी केले. किशोर बनसोडे, रवी साबळे, अमर सावंत, सुनील कसबे यांनी ठरावाचे वाचन केले. विजय बनसोडे यांनी आभार मानले.

प्रा. गौतमीपुत्र कांबळे पुढे म्हणाले की, भारतीय संविधान हे धर्मनिरपेक्ष आहे. ते कोणत्याही एका धर्माचा पुरस्कार करत नाही. सर्वांना धर्म निवडण्याचे स्वातंत्र्य देते. हे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी निकोप वातावरण अबाधित ठेवण्याची जबाबदारी सरकारची असताना नेमके याच्या उलटे काम सरकार करत आहे. खरे तर माणसाला जगण्यासाठी धर्माची गरज असत नाही. कोणीही माणूस धर्माने दिलेल्या शिकवणीपप्रमाणे १०० टक्के आचरण करतोच असे नाही. सर्व धर्म स्क्रॅप करण्याची वेळ आली आहे. ज्याला जो धर्म आवडेल त्या धर्मात प्रवेश करण्याचे स्वातंत्र्य आहे. तसेच कोणत्याही धर्मात न जाता निधर्मी राहण्याचेही स्वातंत्र्य देशातील नागरिकांना आहे. धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कांबाबत सेक्युलर मुव्हमेंट राज्यातील जनतेला प्रबोधित करत आहे. धर्मांतर बंदी कायद्याविरोधात आवाज बुलंद होत आहे. सरकारने लोकभावनेचा आदर करावा. अन्यथा आम्हाला तीव्र स्वरूपाचे आंदोलन करावे लागेल.

अध्यक्षीय भाषणात सेक्युलर मुव्हमेंटचे कार्याध्यक्ष भरत शेळके म्हणाले की, धर्मांतरबंदीचा कायदा करुन नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा हा डाव आहे. याला विरोध करून भारतीय संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कांबाबत लोकलढा उभारण्यासाठी राज्यभर अशा परिषदा घेत आहोत. धर्मांतर बंदी कायद्याचे विधेयक यापूर्वी चारवेळा संसदेत सादर झाले होते. मात्र असा कायदा करणे हे संविधान विरोधी असल्याची ठाम भूमिका त्यावेळच्या विरोधी पक्षांनी घेतल्याने हा कायदा होऊ शकला नाही. केंद्र सरकारने कुटील डाव खेळत हा कायदा पारित करण्याचे अधिकार राज्य सरकारांना दिले. तब्बल आठ राज्यांमध्ये धर्मांतर बंदी कायदा लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्रातही हा कायदा लागू करण्याचा डाव सुरू आहे. मात्र, आम्ही तो कदापिही यशस्वी होऊ देणार नाही.

ज्येष्ठ पत्रकार तथा लोकसत्ताचे सहसंपादक मधु कांबळे म्हणाले की, देशातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही सुटलेले नाहीत. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधांसाठी अजूनही लोकांना संघर्ष करावा लागत आहे. संविधानाने देशातील नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क हिरावून घेतले जात आहेत. धर्मांतर बंदी कायदा हे त्यातीलच एक उदाहरण आहे. हा कायदा होऊ नये यासाठी राज्यातील सर्वांनी सजग राहण्याची गरज आहे. आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाह परिवार समन्वय समितीच्या माध्यमातून सरकार विनाकारण हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत आहे.



## युवासेना उत्तर तालुकाप्रमुखपदी गजघाटे

✔ **उ. सोलापूर** : सोलापूर शिवसेना संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत सर यांच्या हस्ते आकाश गजघाटे यांची जिल्हा प्रमुख अमोल शिंदे,प्रवक्त्या ज्योती वाघमारे,शहराध्यक्ष मनोज शेजवाल,जिल्हा सचिव जावेद पटेल,उप जिल्हा प्रमुख राजकुमार शिंदे,संजय सरवदे,हरिभाऊ चौधुले, नाना मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड करण्यात आली.यावेळी युवा जिल्हा प्रमुख प्रियदर्शन साठे, सागर शितोळे, विद्यार्थी सेनेचे जिल्हा प्रमुख सुजित खुर्द, उत्तर तालुका प्रमुख सुधीर गोरे, प्रकाश शिंदे, विशाल कल्याणी, उमाकांत करंडे, शशी शिंदे याच्या सह कार्यकर्ते उपस्थित होते.

## दहावी परीक्षेत तनुष्का राठोडचे घवघवीत यश



✔ **अक्कलकोट** : माध्यमिक शालांत परीक्षेत ९१% गुण मिळवून इंडियन मॉडेल स्कुल येथे शिक्षण घेत असलेली कुमारी तनुष्का राठोड हिने कोणतेही शिकवणी वर्ग न लावता स्वतःच्या अभ्यासाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे.आपल्या या यशात आजोबा,आई वडील,शिक्षकवर्ग व कुटुंबीय यांचा खूप मोठा वाटा असल्याचे तिने सांगितले.तिच्या या यशाची बंजारा समाज संघटनेने दखल घेतली असून रत्नागिरी जिल्हा बंजारा समाज अध्यक्ष मल्लू राठोड,धोत्री पतसंस्थेचे चेअरमन भिमु राठोड,रमेश राठोड,मार्डी पतसंस्था संचालक अशोक नरुटे,ग्रामीण रुग्णालय अधीक्षक अशोक राठोड,प्राध्यापक विनोद वडे,राधिका राठोड या सर्वांनी तिचे अभिनंदन केले आहे.



## मारुती कांबळे यांची सचिव पदी निवड

✔ **उ. सोलापूर** : महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन डी एन इ १३६ शाखा तालुका उत्तर सोलापूर संघटनेची बैठक संघटनेचे उत्तर तालुका अध्यक्ष अध्यक्ष गंगाधर कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत मारुती कांबळे यांची सचिव पदी बिनविरोध निवड करण्यात आली. माजी सचिव कै- गणेश मोरे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी सहसचिव- भालचंद्र निंबर्गी, गणेश नारायणकर, उपाध्यक्ष - अनिल शिंदे, नंदकुमार पाटील, कोषाध्यक्ष- भालचंद्र काळे, ग्रामसेवक- विठ्ठल शिंदे- प्रतापसिंह भोई, कृष्णापा डवले, राम कांबळे,ग्रामसेवविका- रेश्मा नागटिळक, निलम उघडे , अनुराधा ननवरे, ज्योती बिराजदार , मिनाक्षी सरवदे,ग्रामसेवक- शशिकांत कुंभार, बापूराव हाके, संजय पाटील, सुरेखा राठोड उपस्थित होते.सचिव पदी मारुती कांबळे यांची निवड झाल्याबद्दल पुढील कार्यास गटविकास अधिकारी एम पी पाटील यांच्यासह संघटनेतील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.



## अक्षय भालेरावची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपींवर कारवाईची मागणी

✔ **पंढरपूर** : नांदेड जिल्ह्यामध्ये दि.१ जून रोजी बोंढार ता.जि.नांदेड या गावी डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून भीमसैनिक शहीद अक्षय भालेराव यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पंढरपूर यांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

कायदेशीर मुद्द्यांवर तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पंढरपूर शहर यांच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल. याबाबतचे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पंढरपूर शहर अध्यक्ष ड.किर्तीपाल सर्वगोड यांनी सोलापूर ग्रामीण पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे सहा. पोलीस अधिक्षक हिम्मतराव जाधव व पंढरपूर विभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्याकडे देण्यात आले. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) सोलापूर जिल्ह्याचे नेते अरविंद कांबळे, प्रवीण माने, दिपक चंदनशिवे, युवक नेते अमित कसबे, युवक शहराध्यक्ष विशाल मांदळे, संघटन सचिव संदेश माने, कोषाध्यक्ष सचिन भोरकडे, प्रशांत सर्वगोड, अक्षय आठवले आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## वीज पडून एकाचा मृत्यू

✔ सुराज्य/सांगोला



सांगोला तालुक्यातील काळूबाळूवाडी येथे चरण्यासाठी शेळ्या घेऊन गेलेल्या भगवांन शामराव होनमाने वय ४० वर्षे याचा वीज पडून मृत्यू झाला .त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे

दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास सांगोला तालुक्यात सर्वत्र वादळी वारे मोठ्या प्रमाणात झाले या वादळी वाऱ्यात झाडे उन्मळुन पडली विजेचे खांब पडले यामुळे वीज पुरवठा खंडित झाला आहे .पावसाची फक्त एक सर झाली.

अनेक शेतकऱ्यांच्या ढेपनी उडून गेल्या आहेत. काळू बाळू वाडी येथे आपल्या शेळ्या चरण्यासाठी कांबळे वस्ती कडील वडचावर भगवान होनमाने हे गेले होते अचानक साडेतीन वाजण्याच्या सुमारास अंगावर वीज पडल्याने ते जागीच मरण पावले आहेत .

## कदमवाडी येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन

✔ सुराज्य/नातेपुते



कदमवाडी (ता. माळशिरस) येथील यादववस्ती ते करडेवस्ती पानंद रस्त्याच्या कामाचे २४ लाख रुपयांचे भूमिपूजन,भोसलेवस्ती येथे सिमेंट कॉंक्रिट रस्ता व बंदिस्त गटार करणे ८ लाख व मारुती सभामंडप कामाचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, मार्केट कमिटीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, ज्येष्ठ नेते गणपतराव वाघमोडे, नगरसेवक ॲड.बी. वाय. राऊत ,माजी उपसभापती अर्जुनसिह मोहिते पाटील ,राहुल बापु वाघमोडे, अरूण तोडकर,बाळासाहेब लवटे,अकलूज कृषीउत्पन्न बाजारसमितीचे मा. संचालक केशवराव कदम,जेष्ठ नेते भारत अंबु कदम,उपसरपंच दत्तात्रय मजगे,कांतीलाल कदम,महादेव राघू कदम, मारुती लालू भोसले,दादासो वसंत कदम,सोमनाथ ज कदम, सतीश रामचंद्र कदम,पुरषोत्तम भीमराव कदम, दत्तात्रय कोंडीबा कदम दत्तू भोसले, परशुराम भोसले, लक्ष्मण अण्णा वाघमोडे, संतोष वाघमोडे साहेब,किरण केशवराव कदम,तुषार भोसले, शुभम दत्तू भोसले, किरण भोसले मा. सरपंच चांगुणा वाघमोडे,कॉन्ट्रॅक्टर रोंगे साहेब, अनिकेत पवार, सागर पवार अनेक मान्यवर शंकर सहकारी,साखर कारखान्याचे संचालक , कृषी उत्पन्न बाजार समितीचे .संचालक , शिवामृत दूध संघाचे संचालक , विविध ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, पंचायत समिती माळशिरसचे बांधकाम विभागाचे, ग्रामीण पाणीपुरवठ्याचे अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकर यांची जयंतीनिमित्त वेळापूरमध्ये मिरवणूक

✔ सुराज्य/वेळापूर



वेळापूर (ता. माळशिरस) येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते पिनू येडगे व जयंती उत्सव समिती वेळापूर यांच्यावतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची रथातून वेळापूर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

प्रारंभी मिरवणुकी च्या रथांमधील अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव, युवा नेते लखनदादा चौगुले पंढरपूर ,बहुजन मुक्ती पार्टीचे प्रदेश प्रवक्ते काकासाहेब जाधव, लक्ष्मणतात्या बनपट्टे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच उपस्थित पै सचिनभाऊ कुरळे, खुडूस गावचे युवा नेते बाजीनाना सरगर ,वेळापूर गावचे गटनेते संजयआबा मंडले, युवा नेते स्वप्निल माने देशमुख , वेळापूर गावचे तंटामुक्ती समिती अध्यक्ष युवराज मंडले, भैया कोडग, विनायकबाबा चंदनशिव, लखनतात्या मंडले या सर्व मान्यवरांचा यावेळी पिनू येडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यानंतर अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणुकीस प्रारंभ झाला. सदर मिरवणुकीत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर मिरवणूक पालखी चौक वेळापूर, एसटी स्टँड वेळापूर, बाजारतळ , वेळापूर पोलीस स्टेशन, पालखी चौक वेळापूर या मार्गाने काढण्यात येऊन पालखीमैदान येथे मिरवणुकीची सांगता झाली.

मिरवणूक सोहळा पार पाडण्यासाठी नाथाजी मोहिते, योगेश शेटे, पिनू लोखंडे , अनंत मंडले, दत्तात्रय येडगे, सागर जगताप ,ओंकार खराडे, प्रशांत चंदनशिव, नितीन भाकरे, बजरंग कानगे, रूषिकेश निंबाळकर, नितीन कुरळे, कमलेश कसबे, अरून लोखंडे, नारायण सर्वगोड आदिंनी सहकार्य केले.

## ग्रुपींग न आल्यामुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशाचे स्वप्न भंगले

✔ सुराज्य/पिलीव

नुकताच बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये अनेक विदयार्थी उत्तीर्ण झाले आहेत .कॉलेज वाले पण आपला निकाल शंभर टक्के लागला असल्याचा मोठा गाजावाजा करीत आहेत पण यामध्ये अनेक विदयार्थी अभियांत्रिकी तसेच वैदयकीय प्रवेशापासुन वंचीत राहणार असे चित्र आहे.

अनेक विद्यार्थ्यांचे ग्रुप ए व ग्रुप बी यामध्ये अनेक विद्यार्थी खासगी कलासेस लावतात व नीट व सिईटीची तयारी करतात. इकडे थेअरीच्या अभ्यास क्रमाकडे अक्षम्य दुर्लक्ष करतात. त्यामुळे बोर्ड परीक्षेला गुण कमी मिळत असल्याचे चित्र सध्या पाहवयास मिळत आहे. लाखो रुपये खर्च करुनही ग्रुप न बसल्या मुळे अनेक विदयार्थी अभियांत्रिकी व वैदयकीय अभ्यास क्रमास मुकणार असेच चित्र आहे. वैद्यकीय परीक्षेत भौतिकशात्र,रसायनशात्र व जीवशात्र या तीन विषयात खुल्या प्रवर्गासाठी ५० टक्के तर राखीवसाठी ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे. तर अभियांत्रिकी प्रवेशासाठी भौतीकशात्र,रसायनशास्त्र, गणित या विषयात खुल्या प्रवर्गासाठी ५० टक्के तर राखीवसाठी ४५ टक्के गुण असणे आवश्यक आहे . यापेक्षा कमी गुण असतील अभियांत्रिकी शाखेला प्रवेश मिळू शकत नाही. यामुळे कॉलेज असो किंवा खासगी क्लासेस असो अगोदर त्यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा म्हणजे थेअरीचे महत्व समजावुन सांगुन त्याची तयारी करणे आवश्यक आहे. अन्यथा याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हजारो विद्यार्थी अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशापासून वंचीत राहणार असल्याचे चित्र यंदा दिसत आहे. यामुळे विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन लाखो रुपये खर्च करूनही डॉ. इंजिनिअर होण्याचे स्वप्न भंगणार आहे. यामुळे विद्यार्थी पालक यांनी अगोदरच काळजी घेणे आवश्यक आहे.

## पिलीव येथे महाराणा प्रताप जयंतीनिमित्त मिरवणुकीचे आयोजन

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे महाराणा प्रताप जयंती निमित्त पिलीव बाजारपेठेतुन महाराणा प्रताप यांच्या प्रतीमेची समाजबांधवाच्यावतीने भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीमधये गणेश भैस,समर्थ जामदार, अंकुश भैस, समशेर रजपुत, कुमार भैस,विशाल जनवर,सतीश रजपुत, अनंता जामदार, राजेंद्रसिंग जामदार, विठ्ठल भिसन,प्रमोद भैस,नितीन जामदार, धिरज जामदार, अतुल भैस,रणजित मंजार,अक्षय भिसन, मयुर भैस, सागर भैस, राहुल जामदार, नागेश जनवर,सोमनाथ भैस यांच्या सह महाराणा प्रतिष्ठानचे पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर मिरवणुकीवेळी पिलीव पोलीस ठाणयाचे ठाणे अंमलदार पंडीत मिसाळ व अमीत जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## पत्नीने पतीच्या डोक्यात घातला दगड

✔ सुराज्य/सोलापूर

घराचे कुलूप तोडून घरातील संसारउपयोगी वस्तू छोटा हत्ती वाहनात घेऊन जाणाऱ्या पत्नीला जाब विचारल्याने तिने पतीच्या डोक्यात दगड मारल्याची घटना रविवारी घडली.

फिर्यादी सिद्राम धोंडीबा वाघमोडे (वय-३७,रा.ससाणे नगर, एस.आर.पी कॅम्प,विजापूर रोड) यांनी पत्नी संगीता वाघमोडे यांच्याविरोधात फिर्याद दिली आहे.

पतीने पत्नी संगीता हिला तू कोणाला विचारून घराचे कुलूप तोडलीस व घरातील वस्तू का घेऊन जात आहे असे विचारण्याच्या कारणावरून तिच्यासोबत आलेल्या छोटा हत्ती वाहनाच्या चालकांनी व इतर एकाने मिळून पती सिद्राम यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच फिर्यादी यांच्या पत्नीने खाली पडलेला दगड घेऊन फिर्यादी यांच्या डोक्यात मारून जखमी केले. फिर्यादी यांच्या शर्टाच्या खिशातील २० हजार रुपये काढून घेतले असल्याची फिर्याद विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे.चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोसई वाल्मिकी हे करीत आहेत.

## इलेक्ट्रिक वायर काढण्यावरून लाकडी दांडक्याने मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

बांधकामाच्या ठिकाणी पाणी मारत असताना भिंती लगत असलेली इलेक्ट्रिक वायर काढण्याच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १ जून रोजी रात्री सात वाजण्याच्या दरम्यान काशी कापडी गल्ली पश्चिम मंगळवार पेठ येथे घडली. याप्रकरणी आनंद भिकाजी जाधव (वय-३७,रा.ए जी पाटील नगर,जुळे सोलापूर) यांनी जोडबावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून निलाबाई चंद्रकांत जाधव,शुभम राजू काशीद,प्रशांत गणपत गवळी,सौरभ दीपक चवरे (सर्व.रा. काशी कापडी गल्ली,पश्चिम मंगळवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. आनंद व त्यांची आई तसेच भाऊ संदीप असे मिळून बांधकामाच्या ठिकाणी पाणी मारत होते. इलेक्ट्रिक वायर आनंद यांनी चुलती नीलाबाई जाधव यांना काढण्यास सांगितले असता, त्यांनी शिवीगाळ करत वायर काढत नाही असे म्हणाल्या. वरील चौघांनी त्यांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. पो.हे.कॉ. नाईकवाडी तपास करीत आहेत.

तक्रारीबाबत विचारण्यासाठी गेल्यावर मारहाण

दिलेल्या तक्रारी बाबत विचारण्यासाठी गेलेल्या सरोजीनी राजाराम गोफणे (वय-५३,रा.बंडे संकुल नगर,बाळे) यांना चंद्रकांत बाबुराव गोफणे,रुपीका हर्षवर्धन गोफणे (दोघे रा.स्वारगेट),स्नेहा मंदार गोफणे, तानाजी बाबुराव दोडतले (रा.हैद्राबाद) यांच्यावर सदर बाझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहेत. त्या आपल्या पतीसोबत आरोपींना रेल्वे स्टेशन परिसरातील हॉटेल येथे भेटायला गेल्या होत्या. तेव्हा आरोपींनी फिर्यादीच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिली.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून पालखीतळ, पालखी मार्गाची पाहणी

✔ सुराज्य/अकलूज



संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आणि अन्य संतांच्या पालखी सोहळ्यासोबत आषाढी वारीसाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालखी तळ व मार्गावरील तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचना प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिल्या.

संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या तयारीसाठी सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गाची व विविध पालखीतळांची पाहणी प्र. जिल्हाधिकारी ठोंबरे यांनी आज केली.

यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सुशील बेल्हेकर, अमरदीप वाकडे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, विनायक गुळवे, मुख्याधिकारी अरविंद माळी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, उपकार्यकारी अभियंता ज्योती डुंगवले तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. ठोंबरे म्हणाले, जिल्ह्यात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आगमन २३ जून तर जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे आगमन २४ जून २०२३ रोजी होणार आहे. पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखीतळावर तसेच विसाव्याच्या ठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी, शौचालय, वाहतूक व्यवस्था, रस्ते, आरोग्य, प्रखर प्रकाश व्यवस्था, पालखीतळावरील मुरूमीकरण, पालखी व विसावा कट्ट्यांच्या दुरुस्तीबाबत प्रशासनातील सर्व शासकिय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. लाखो वारकऱ्यांचा चैतन्यदायी सोहळा म्हणजे रिंगण सोहळा या सोहळयास मोठ्या प्रमाणात गर्दी होते या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करावे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी तळाशेजारची अपुरी असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. पालखी सोहळ्याच्या प्रताप परंपरेचे जतन करण्यासाठी कामे प्राधान्याने करावीत अशा सूचनाही प्र. जिल्हाधिकारी श्री. ठोंबरे यांनी दिल्या. धर्मपुरी, नातेपुते, माळशिरस, तोंडले बोंडले, बोरगाव, माळीनगर तसेच पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली भंडीशेगांव, वाखरी पालखीतळ, रिंगण सोहळ्याची ठिकाणी तसेच ६५ एकर व नदी पात्राची त्यांनी पाहणी करून सूचना दिल्या.

# मुंबईसह १२ जिल्ह्यांना पावसाचा इशारा

✔ सुराज्य/मुंबई

**हवामानात वारंवार होणाऱ्या बदलांमुळे राज्यात ऊन आणि पावसाचा लपंडाव सुरू असल्याचं पाहायला मिळतं. काही जिल्ह्यांमध्ये कडक ऊन आहे तर काही ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अशात महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पुढच्या ३-४ तासांत तुफान पाऊस होईल, असा इशारा हवामान खात्याच्या मुंबई विभागाने दिला आहे.**

- - - - - - - - - -

आयएमडी मुंबईने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईसह अनेक उपनगरांमध्ये २४ तासांत ढगाळ आकाश असून संध्याकाळी किंवा रात्री हलका रिमझिम पाऊस पडण्याची शक्यता आहे. यावेळी कमाल आणि किमान तापमान अनक्रुमे ३४ ते २८ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. तर रविवारी ठाणे आणि पालघरमध्येही रिमझिम पाऊस होऊ शकतो. तर धुळे, नंदुरबार, नाशिक जळगाव, औरंगाबाद, वाशिम, यवतमाळ, वर्धा, अमरावती या जिल्ह्यांतील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्याची शक्यता आहे. यावेळी ३०-४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील तर हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तण्यात आली आहे. येत्या ३ ते ४ तासात नाशिक आणि जळगावमध्ये गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना खबरदारी घ्यावी अशा सूचना हवामान खात्याकडून देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात म्यानमार किनाऱ्याजवळ समुद्रसपाटीपासून ३.१ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती कायम आहे. तर दक्षिण छत्तीसगड आणि तेलंगणा परिसरावरही चक्राकार वारे वाहत आहेत. या प्रणालीपासून बिहारपर्यंत दक्षिणोत्तर हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. याचा परिणाम महाराष्ट्रातही पाहायला मिळत असून यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.



## जळगावात वादळी पावसाचा कहर

जळगावात रविवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर दाणादाण उडाली. अचानकच्या वादळी वाऱ्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड गोंधळ उडाल्याचे पाहायला मिळाला. वादळी वाऱ्याबरोबर विजांचाही कडकडाट होत असल्याचे पाहायला मिळाले. गेल्या काही दिवसांपूर्वी तापमानात अचानक वाढ झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उकाड्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत होता. मात्र, सकाळी उन्हाचे चटके लागत होते आणि दुपारी अचानक वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. तर काही ठिकाणी पाऊसही सुरू आहे.

## धुळ्यातही पावसाची हजेरी

धुळे शहरात रविवारी सकाळी (रविवारी) जोरदार पावसाने हजेरी लावली. धुळे शहरातील काही भागात गारादेखील पडल्या. दरम्यान, गेल्या आठवड्याभरापासून दिवसभर उन्हाचा तडाखाही वाढला होता. त्यामुळे वातावरणात गारवा तयार झाला होता. हा पाऊस नुकसानकारक असला तरी खरिपासाठी योग्य असल्याची चर्चा शेतकरी वर्गामध्ये सुरू आहे. धुळे जिल्ह्यातील शिरपूर, साक्री तालुक्यांतील काही भागांत गारांसह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे टोमॅटो आणि अन्य पिकांनाही फटका बसणार आहे. अनेक जणांच्या शेतात कांदा काढून ठेवला असून, तो देखील सडण्याची शक्यता आहे.

## महत्त्वाचे वृत्त



### 'या' कारणामुळे घडला अपघात

✔ **सुराज्य/भुवनेश्वर :** ओडिशातील बालासोर जिल्ह्यातील बहनगा रेल्वे स्थानकाजवळ शुक्रवारी सायंकाळी झालेल्या रेल्वे अपघातातील मृतांची संख्या शनिवारी २८८ झाली, तर जखमींचा आकडा ९००वर जाऊन पोहचला आहे. आतापर्यंतच्या भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा रेल्वे अपघात मानला जात असून ओडिशातील या मृत्यूतांडवानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींसह विरोधी पक्षांमधील नेत्यांपासून ते राजकिय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी याबाबत दु:ख व्यक्त केले आहे. पण या अपघाताबाबत एक महत्त्वाची माहिती आता समोर आली आहे. सिग्नल बिघाडामुळे हा अपघात झाल्याचे आता सांगण्यात येत आहे. या घटनेची अधिक चौकशी करण्यात येत आहे. पण प्राथमिक चौकशीतून ही माहिती समोर आली आहे.

### पुण्यात पावसाची हजेरी; नागरिकांची तारांबळ

✔ **सुराज्य/पुणे :** पुण्यातील काही भागात रविवारी पावसाने हजेरी लावेली. ऐन सुट्टीच्या दिवशी पाऊस पडल्याने पुणेकर सुखावले आहेत. बच्चे कंपनीची मज्जा सुरू आहे. अचानक आलेल्या पावसाने काही भागात वाहतूककोंडी झाली आहे. औंध, बाणेर रोड, विद्यापीठ परिसर, सांगवी या भागात जोरदार पाऊस सुरू झाला आहे. अचानक पडलेल्या मान्सूनपूर्व पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली आहे. सुट्टीसाठी बाहेर पडलेल्या पुणेकरांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूककोंडी निर्माण झाली आहे. हवेत गारवा आला आहे. खड्ड्यांमुळे किरकोळ अपघात झाले आहेत.

### समीर वानखडेला जीवे मारण्याची धमकी

✔ **सुराज्य/मुंबई :** डॉन दाऊद इब्राहिमच्या नावाने आपल्याला जीवे मारण्याची धमकी येत आहे, अशी तक्रार आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांनी पोलिसांत केली आहे. मला आणि माझ्या कुटुंबीयांना काही धोका झाल्यास जबाबदार कोण, असा सवाल वानखेडेने केला आहे. खोट्या ट्विटर अकाऊंटवरून धमकी येत असल्याचा दावा समीर वानखेडे यांनी केला आहे. समीर वानखेडे विरोधात नोंदवलेला गुन्हा योग्य आहे. या गुन्ह्याविरोधात समीर वानखेडे यांनी केलेली याचिका फेटाळून लावावी, असे प्रतिज्ञापत्र Central Bureau of Investigation (CBI) ने मुंबई उच्च न्यायालयात केले आहे. त्यामुळे समीर वानखेडे यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

### आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा अनागोंदी कारभार

✔ **सुराज्य/मुंबई :** महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाने केवळ हरकती आल्या म्हणून नऊ नामनिर्देशित सिनेट सदस्यांच्या नियुक्त्या कोणतीही सूचना किंवा प्रक्रिया न राबवता वीस दिवसांत रद्द केल्या आहेत. याचा फटका विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. गजानन एकबोटे यांच्यासह ज्येष्ठ सिनेट सदस्यांना बसला आहे. मंत्रालयातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी ठरावीक लोकांची सदस्यपदी नियुक्ती करण्यासाठी दबाव टाकल्यामुळेच नियुक्त्या रद्द केल्या, असा आरोप करण्यात येत आहे.

### चार कोयते हातात घेऊन व्हिडिओ काढला

✔ **सुराज्य/कल्याण :** सध्याच्या तंत्रज्ञानाच्या काळात आपण लोकप्रिय कसे होऊ शकतो असा विचार लोक करत असतात. यासाठी ते कोणत्याही थराला गेल्याचे अनेक घटनांमधून समोर आले आहे. काही वेळेस असे करणे जीवाला धोकादायक बनते तर काही वेळेस यासाठी विचित्र कृत्य केल्याने तुरुंगवारीही घडते. दरम्यान घातक शस्त्रासह व्हिडीओ तयार करत हे व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याचे फॅड तरुणांमध्ये वाढत चालले आहे. असाच एक प्रकार कल्याण पूर्वेतील एका तरुणाने आपली दहशत निर्माण करण्यासाठी केला. त्या तरुणाने चार कोयते हातात घेऊन सोशल मीडियावर व्हिडिओ अपलोड केला. मात्र घातक शस्त्रे बाळगणे हा गुन्हा असल्याने हीच हौस तरुणाच्या चांगलीच अंगलट आली आहे.

### काठावर पास; सर्वच विषयात ३५ मार्क्स

✔ **सुराज्य/ठाणे :** दहावीच्या निकालात अगदी शंभर टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चर्चा कानावर येतात. मात्र ठाण्यातील एका पठ्ठ्याने सर्वच विषयात ३५ गुण मिळवले आहेत. त्याच्या या अनोख्या यशाचे कुटुंबियांना कौतुकच आहे. आमच्या मुलाच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहणार असा, विश्वास त्याच्या कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आपल्या आई - वडिलांच्या कष्टाचे चीज करण्यासाठी मॅकेनिकल इंजिनिअर बनून त्यांची स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास ३५ टक्के मिळवत 'काठावर पास' झालेल्या विशाल कराड या विद्यार्थ्याने उराशी बाळगला आहे.

### वाघांच्या झुंजीत 'सावकार'चा मृत्यू

✔ **सुराज्य/नागपूर :** उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात शनिवारी वाघाचा मृतदेह आढळून आला. दोन वाघांच्या झुंजीत या वाघाचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे. मरण पावलेला वाघ हा ब्रह्मपुरी येथून या जंगलात आलेला 'सावकार' नावाचा असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात पुढील तपास साहाय्यक वनसंरक्षक मंगेश ठेंगडी आणि वनपरिक्षेत्र अधिकारी मंगेश ताटे करीत आहेत.

### वटपौर्णिमेच्या पूजेवेळीच झाडाला आग

✔ **सुराज्य/कोल्हापूर :** शनिवारी राज्यात सर्वत्र वटपौर्णिमेचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात असलेल्या वडाच्या झाडाला अचानक आग लागली आहे. यामुळे मंदिर परिसरात एकच खळबळ उडाली. दरम्यान मंदिरातील कर्मचाऱ्यांनी तत्काळ अग्निरोधक मशीनद्वारे आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. कोल्हापुरातील श्री अंबाबाई मंदिर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिरात अंबाबाईसह अनेक छोटी मोठी मंदिर आहेत. वटपौर्णिमेनिमित्त अंबाबाई मंदिर परिसरातील महिला मोठ्या प्रमाणात मंदिरात आल्या होत्या. यावेळी मंदिर परिसरातील वडाच्या झाडाला पूजा करण्यासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी पूजा सुरु असतानाच वडाच्या झाडाने अचानक पेट घेतला. दरम्यान महिला या झाडाखाली मोठ्या प्रमाणात कापूर आणि उदबत्ती लावून वडाच्या झाडाला प्रदक्षिणा मारत होत्या. याचवेळी बांधलेल्या दोऱ्याला अचानक आग लागली. या अचानक लागलेल्या आगीमुळे भडका उडाला. यामुळे मंदिर परिसरात एकच खळबळ उडाली.

## ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर यांचे निधन

### ९४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

✔ **सुराज्य/मुंबई :** पद्मश्री तसंच महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं सन्मानित मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना लाटकर यांचं रविवारी निधन झालं. वयाच्या ९४ व्या वर्षी दादर येथील खासगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही महिन्यांपासून सुलोचना श्वसनाशी संबंधित संसर्गानं आजारी होत्या. त्यांच्यावर उपचार सुरू होते.



अखेर रविवारी उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. रविवारी सायंकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी सुलोचना दीदींचं निधन झालं. आज सायंकाळी ५ वाजता दादरच्या स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

## मुंबई पोलिसांवर जीवघेणा हल्ला

✔ **मुंबई :** मुंबईतील दहिसर पोलिसांच्या पथकावर छत्रपती संभाजीनगरमध्ये जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

ही घटना वैजापूर येथील एका गावात घडली. पोलीस भरती घोटाळ्याचा तपास करण्यासाठी आलेल्या पोलिसांवर आणि त्यांच्या वाहनांवर ३० ते ३५ आरोपींनी तुफान दगडफेक करत हल्ला केल्याची माहिती आहे. ही घटना शुक्रवारी रात्री सायंकाळच्या दरम्यान घडली. पोलीस घोटाळ्यातील संशयित आरोपींना देखील जमावाने पळवून लावल्याचं सांगितलं जात आहे.

## यंदा मुंबई तुंबणार नाही

### महापालिकेचे 'या' भागात खास नियोजन

✔ सुराज्य/मुंबई

अतिवृष्टी आणि भरतीच्या काळात सखल भागात पाणी साचून नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून महापालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाकडून अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत. आरसीसी बॉक्स ड्रेन, मायक्रो टनेलिंग, फ्लड गेट, पाणी साठवण टाक्या, मिनी पंपिंग स्टेशन यासारख्या उपाययोजनांमधून पावसाच्या पाण्याचा जलद उपसा करणे शक्य होणार आहे. त्यामुळे, यंदा हिंदमाता, भरणी नाका (वडाळा अग्निशमन केंद्र) भायखळा, शीव आणि माटुंगा स्थानक, महालक्ष्मी स्थानक, नायर रुग्णालय या अतिशय सखल परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल, असा दावा पालिकेने केला आहे.



नायर रुग्णालय मोरलँड मार्ग, एम. ए. मार्ग, मराठा मंदिर जंक्शन, जेकब सर्कल (सातरस्ता) या भायखळा ई आणि वरळी जी/दक्षिण विभागातील सखल परिसरात जास्त पाऊस झाल्यानंतर वारंवार पाणी साचते.

या ठिकाणी पाणी उपसा करण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या विभागाने १२०० मिमी व्यासाच्या दोन वाहिन्या टाकल्या आहेत. महालक्ष्मी रेल्वे कल्व्हर्टपासून डॉ. ई. मोझेस मार्गावरील फेमस स्टुडिओ बस थांब्यापर्यंत जी दक्षिण विभागाच्या हद्दीतील कामात डबल बॅरल बॉक्स ड्रेनमधून या वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळ पश्चिम रेल्वेच्या आवारात मिनी पंपिंग स्टेशन उभारले आहे. ताशी ३ हजार घनमीटर क्षमतेचे सबमर्सिबल पंप याठिकाणी बसवले आहेत.

# यंदा डाळ मिळणार स्वस्त

## केंद्र सरकारकडून तूर व उडीद डाळीबाबत महत्वपूर्ण निर्णय

✔ सुराज्य/नवी दिल्ली

कमी उत्पादनामुळे दरवाढीच्या दिशेने सुरू असलेल्या डाळींच्या प्रवासावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने साठ्यावर मर्यादा आणली आहे. याअंतर्गत किरकोळ दुकानात कमाल ५ टनापर्यंतच साठा करता येणार आहे.

यंदा डाळ उत्पादनात सरासरी १० टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे एकीकडे दरवाढ सुरू असतानाच दुसरीकडे साठेबाजही सक्रिय झाले आहेत. डाळींचा साठा होऊन कृत्रिम दरवाढ होऊ नये यासाठी केंद्र सरकारने दोन महिन्यांपूर्वी विशेष समिती स्थापन केली होती. या समितीने राज्य सरकारी अन्नधान्य वितरण विभागासह अभ्यास केला. त्यानुसार आता साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकारने साठ्यावर मर्यादा आणली आहे.



घाऊक विक्रेता अधिकाधिक २०० टन डाळीचा साठा करू शकतो. हीच मर्यादा किरकोळ विक्रेत्यांसाठी ५ टन आहे. तर दुकानांची साखळी चालविणाऱ्या सुपर मार्केटला दुकानात ५ टन आणि गोदामात २०० टनाच्या साठ्याचीच परवानगी असेल. तर डाळी तयार करणाऱ्या गिरण्यांना एकूण तीन महिन्यांचे उत्पादन अथवा गिरणीच्या वार्षिक स्थापित क्षमतेचे २५ टक्के, यापैकी जे अधिक असेल, तेवढ्या साठ्याची मर्यादा असेल. आयातक अधिकाधिक ३० दिवसांचा साठा ठेऊ शकतील.

या मर्यादा ३१ ऑक्टोबरपर्यंत उडीद व तूरडाळींसाठी असतील.

## 'महावितरण'ची राज्यात ६२ चार्जिंग स्टेशन; पुण्याला प्राधान्य

✔ सुराज्य/मुंबई

इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी 'महावितरण'ने राज्यात ६२ चार्जिंग स्थानके उभारली असून, त्यामध्ये पुण्यात सर्वाधिक २३ चार्जिंग स्थानकांचा समावेश आहे. या स्थानकांवर चार्जिंग करणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांची संख्या सातत्याने वाढत आहे.



राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी पायाभूत सुविधा उभारण्यास महावितरणला नोडल एजन्सी' म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. इव्ही चार्जिंग स्थानके वाढविण्यासाठी महावितरणने स्वतंत्र संकेतस्थळ कार्यान्वित केले आहे. त्याद्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे चार्जिंग स्थानक उभारण्यास चालना दिली जात असून, नव्या स्थानकांना सुलभ प्रक्रियेद्वारे तत्पर वीजजोडणी दिली जात आहे. याशिवाय महावितरणने 'पॉवरअप ईव्ही' हे मोबाइल प्लिकेशन उपलब्ध करून दिले आहे. त्यातून इलेक्ट्रिक वाहनचालकांना जवळचे चार्जिंग स्थानक शोधणे, चार्जिंगसाठी लागणारा वेळ, वापरलेले वीज युनिट, व्यवहारासाठी वॉलेट व बॅलन्स आदी माहिती मिळत आहे, असे महावितरणतर्फे सांगण्यात आले.

## राऊतांची तलवार म्यान पवारांविषयी व्यक्त केला खेद

✔ **नाशिक :** धरणामध्ये लघुशंका करण्यापेक्षा थुंकणे चांगले, असा खोचक टोला हाणत विरोधी पक्षनेते अजित पवार यांना लक्ष्य करणारे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आता या वादातून सपशेल माघार घेतली आहे. अजित पवार यांच्याविषयी अर्धवट माहितीच्या आधारे मला प्रश्न विचारण्यात आला. मी आणि अजितदादा कोणत्याही गोष्टींवर लगेच प्रतिक्रिया देतो. मी अजित पवार यांच्याविषयी कडक शब्दात बोललो, त्याचा खेद व्यक्त करतो, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. ते रविवारी नाशिकमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

अजित पवार यांनी संजय राऊत यांच्या कृतीविषयी भाष्य केल्यानंतरच्या वादाला तोंड फुटले होते. अजित पवार यांनी संजय राऊत यांच्या बोचऱ्या टीकेनंतरही सामंजस्याची भूमिका घेतली होती.

## नोकरीचे आमिष दाखवून कोट्यवधींची फसवणूक

✔ **नागपूर :** शाळेत स्काउट गाइडच्या प्रशिक्षकपदी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एक डझनपेक्षा अधिक तरुणांना कोट्यवधीने गंडा घालण्यात आला. याप्रकरणी सोनेगाव पोलिसांनी सहा ठकबाजांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. शेखर पानबुडे (वय ४२, रा. धरमपेठ), पंकज चौरागडे (वय ४८, रा. गोंदिया), पुरु मेश्राम (वय ४०), लोकेश अमृत ननावरे (वय ३४, रा. भद्रावती), अनिकेत डोंगरे (वय ३४, रा. बेलतरोडी), अनिल डोंगरे (वय ४५) व अनिमेश टेंभेकर (वय ३८) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. उमेश नाना काकडे (वय ३२, रा. भद्रावती) याच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. ठकबाजांनी अशाप्रकारचे एक डझन तरुणांची कोट्यवधीने फसवणूक केल्याचे समोर आले. पोलिस ठकबाजांचा शोध घेत आहेत.

# महिला शिक्षणाधिकाऱ्याच्या घरात सापडले घबाड

## ८५ लाखांची रोकड, ३२ तोळे सोने

✔ सुराज्य/नाशिक

नाशिकमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुन्हा एकदा मोठी कारवाई केली. नाशिक महापालिका शिक्षण अधिकारी सुनीता धनगर यांना ५० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले होते. या कारवाईनंतर एसीबीने त्यांच्या घरातील झाडाझडती घेतली असता तब्बल ८५ लाख रुपयांची रोख रक्कम आणि ३२ तोळे सोनं मिळाले, तर एनसीबीला काही मालमत्तांची कागदपत्रे देखील सापडली आहेत.

एवढी रक्कम पाहून खुद्द एसीबीचे अधिकारी देखील बुचकळ्यात पडले आहेत. जानेवारीपासून आतापर्यंत केलेल्या कारवायांमध्ये ही सर्वात जास्त रक्कम आढळून आल्याचे एसीबी अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

शनिवारी महापालिका शिक्षण विभाग अधिकारी सुनीता धनगर आणि शिक्षण विभागाचा लिपिक नितीन जोशी यांना लाच घेताना एसीबीने रंगेहाथ अटक केली होती. सस्पेंड मुख्याध्यापकास कामावर रुजू करण्यासाठी लागणारे पत्र देण्यासाठी महापालिका शिक्षण विभागातील अधिकारी सुनीता धनगर आणि लिपिक नितीन जोशी यांनी ५० हजारांची लाच मागितली होती.

तक्रारदार हे मुख्याध्यापक असून त्यांना एका प्रकरणात निलंबित करण्यात आलेले होते, कामावर रुजू करून घेण्यासाठी लिपिक जोशी यांनी पाच हजार, तर धनगर ४५ हजार रुपये घेत असताना पथकाने त्यांना ताब्यात घेतले, त्यानंतर त्यांच्या घराची झडती घेतली असता मोठे घबाड पथकाच्या हाती लागले आहे.

सुनीता धनगर यांच्या नावावर दोन फ्लॅट आणि एक प्लॉट असल्याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहिती दिली आहे. प्लॉट आडगाव येथे, एक



फ्लॅट टिळकवाडी, तर दुसरा फ्लॅट उंटवाडी येथे असल्याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे-वालावलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

पालिका शिक्षण अधिकारी असूनही त्यांनी एवढे घबाड जमा केल्याने पथकही अचंबित झाले आहेत. सुनिता धनगर यांच्यावर झालेल्या कारवाईनंतर महापालिकेत खळबळ उडाली आहे.




## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# कुंपणावरचे नेते... !

**निवडणुका जसजशा जवळ येतात त्याप्रमाणे राजकीय नेत्यांच्या 'कोलंटउड्यां' ना ऊत येतो. आपली भावी कारकिर्द उज्वल करण्यासाठी हे नेते आपल्याला सामावून घेणाऱ्या, समजून घेणाऱ्या, चांगली पदे देणाऱ्या आणि विशेष म्हणजे निवडणुकीत तिकीट देणाऱ्या राजकीय पक्षांचा आसरा घेताना दिसून येतात. अगदी असाच प्रकार सोलापूर शहर- जिल्ह्यात होताना दिसून येत आहे. सध्या असेच नेतेगण कुंपणावरच आहेत, ते कधी मागे पाहतात तर कधी पुढे, त्यांना आपल्याच काय समोरच्या राजकीय पक्षाचा देखील अंदाज येत नसल्याने हे नेते सध्यातरी 'कुंपणावर'च आहेत. ते या कुंपणावर कधी छेद देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.**



गेल्या २०१९ विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला एवढी धोबीपछाड झाली होती की अक्षरश: या दोन्ही पक्षांवर आपली दारे उघडी ठेवून बसण्याची पाळी आली होती. आणि झाले तसेच. या दोन्ही पक्षातील एवढे नेते या उघड्या दारातून पळून कुणी भाजपाचा तर कुणी शिवसेनाचा झेंडा हाती घेतला. त्यातील काहींना त्यात यश आले तर काहींवर पश्चाताप करण्याची पाळी आली. आता भाजपा, शिवेसना शिंदे गट, शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी आगामी विधानसभा, लोकसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर आपापली दारे उघडी ठेवली आहेत. ते पक्षातून गयारामांना नव्हे तर आयारामांना सामावून घेण्यासाठी. तसं सर्वच पक्षांनी दुसऱ्या पक्षातून आपल्याकडे येणाऱ्या नेत्यांची संख्या कशी वाढेल, यावरच आपले लक्ष केंद्रीय केले आहे. या सर्व मामल्यात दरबदलू करणाऱ्या नेत्यांची 'निष्ठा' या एका शब्दाला 'कवडी' ची देखील किंमत राहिली नाही. जो पावेल, तो उपयोगी पडेल आणि निवडून येईल का? एवढाचा साधा आणि सरळ निकष सर्वच राजकिय पक्षांनी लावल्याचे दिसून येत आहे.

**सोलापूरचे माजी महापौर महेश कोठे...**, मूळचे काँग्रेसचे, मध्यतंरी ते शिवसेनेत गेले, विधानसभा लढवली पण पराभूत झाले. आता त्यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसला नारा देणे सुरु केले आहे. त्यांनी प्रत्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करुन हातीं 'घड्याळ' बांधले नसले तरी सध्या तरी शहरातील राष्ट्रवादीची सारी सूत्रे त्यांच्याकडे एकवटली आहेत.

भाजपाचे दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख पॅटर्न अलिकडे महेश कोठे यांनी वापरला की काय, असे वाटते. पक्षाचा जो कोणी वरिष्ठ नेता सोलापुरात आला की त्यांना घरी आवताण देऊन त्यांचा पाहुणचार करण्याचा आ. सुभाष देशमुख यांचा एक छंदच. अगदी तसाच छंद महेश कोठे यांनी जोपासला आहे. राष्ट्रवादीचा जो कोणी नेता येईल तो कोठे यांच्या 'राधा कृष्ण' निवासस्थानी पाहुणचार घेतल्याशिवाय जात नाही. हे अलिकडील काळात स्पष्ट झाले आहे. महेश कोठे यांचे यामुळेच पारडे जड झाले आहे. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहिररित्या पक्षप्रवेश केला नसली तरी आताच शहर राष्ट्रवादी काँग्रेस आपली हाती बांधून ठेवली आहे. अशी किमया क्वचितजणांनाच जमते ती महेश कोठे यांना जमली आहे. यामुळे शहर राष्ट्रवादीतील जुण्या-जाणत्या नेत्यांचे डोळे वटारले आहे. महेश कोठे हे सध्या कुंपणावर नसून ते कुंपण्याच्या पलिकडे गेले आहेत. आता ते कसे गेले?, हा ज्याच्या त्याच्या शोधाचा विषय आहे.

विविध संस्थांचे मालक असलेले आणि दरारा असलेले **माजी आ. दिलीप माने...**, सध्या ते कुंपणावर 'हात' बांधून उभे आहेत. पण हातात 'हात' घेण्यासाठी की 'घड्याळ' बांधण्यासाठी हे कुणालाच समजून येत नाही. मधे १ मे रोजी त्यांच्या चिरंजीवांचा जुळे सोलापुरात शाही विवाह सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे नेते व विरोधी पक्षनेते अजित पवार येणार होते. पण प्रकृतीमुळे ते येऊशकले नाहीत. हा भाग अलहिदा. मात्र राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आर्वजून आले. यामुळे आता दिलीपराव हे राष्ट्रवादीत जाणार, हे जवळपास निश्चित, अशी खूणगाठ बांधून त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी आतापासून त्यांच्यामागे 'लाईन' उभी केली आहे. काँग्रेस - शिवसेना - आणि आता राष्ट्रवादी काँग्रेस... असा दिलीपरावांचा प्रवास असणार आहे. दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेसमध्ये कुणाचा पायमोस कुणात नाही. यामुळेच की काय, दिलीपराव राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत की काय?, असे तालुक्यातील कार्यकर्त्यांना वाटत आहे.

**करमाळ्याच्या रणरागिणी रश्मीताई बागल...**, तशा रश्मीताई राष्ट्रवादी काँग्रेसच्या. पण २०१९ च्या तोंडावर रश्मीताईंनी शिवसेनेचे 'शिवबंधन' हाती बांधले. त्यांनी विधानसभा लढवली. पण त्यांना पराभवाच्या सामोरे जावे लागले. अलिकडील काळात त्या सर्वच




शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

पक्षापासून अलिप्त आहेत. त्यांनी कुंपणावर उभे राहून विविध राजकिय पक्षांची टेहळणी सुरु केली आहे. एकीकडे करमाळ्यात त्यांच्या विरोधकांच्या संख्येत वाढ आहे. या पाश्वभूमिवर त्या कुठल्या पक्षाचा दोर पकडणार, याकडे करमाळावासियांचे लक्ष लागले आहे.

**पंढपूरचे भगिरथ भालके...**, त्यांनी मध्यतंरी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेची राष्ट्रवादीकडून पोटनिवडणूक लढवली. स्वत: एक लाखांच्या वर मते घेऊनही त्यांचा थोडक्या मतांनी पराभव झाला. मध्यतंरी राष्ट्रवादीने सर्वे सर्वा शरद पवार पंढरपुरात येऊन गेले. भालके आणि कल्याणराव काळे तिकडे फिरकलेही नाहीत. उलट त्याचवेळी आलेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे पंढरपुरात आल्यावर त्यांच्याशी मात्र भालके- काळे हे गुप्तगु केले. त्यामुळे हे दोघे काँग्रेसच्या वळचणीला जाणार असे म्हणता म्हणता इतक्यात तेलंगणाचे मुख्यमंत्री के. सी. आर. राव यांच्या 'बीआरएस' यांचे भालके यांना आवताण आल्याची चर्चा रंगली. आता भालके- काळे यांच्यापुढे राष्ट्रवादी, काँग्रेस, बीआरएस या तीन पक्षांचा पर्याय आहे. पाहु या, कुंपणावर उभे राहिलेले भालके - काळे कुठला पर्याय निवडतात.

**बार्शीचे माजी आ. दिलीप सोपल...**, या वयातही हरहुन्नरी आणि हजरजबाबी व्यक्तिमत्व अशी ख्याती असलेले दिलीप सोपल. ते सध्या कुंपणावर नसले तर निवडणुकीच्या जोरदार तयारीत आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी, अपक्ष असा त्यांचा प्रवास. युती सरकारमध्ये काही काळ राज्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्रीपद त्यांनी 'मस्त किमया' करुन मिळवले. २०१९ ची विधानसभा त्यांनी शिवसेनेकडून लढवली. पण पारंपरिक प्रतिस्पर्धी राजेंद्र राऊत यांनी त्यांचा पराभव केला. आता सोपल कुंपणावर उभे असले तरी ते कुठला झेंडा हाती न घेता अपक्षाचा नारा देतील, अशी चिन्हे आहेत.

**नगरसेवक आनंद चंदनशिवे...**, महापालिकेतील एक आक्रमक नगरसेवक. बसपाच्या बळावर मोठे झाले. नावाचं वलय तयार झालं. महापालिकेवर तीन वेळा निवडूनही आले. स्वत: निवडून येण्याबरोबरच आपल्या सहकाऱ्यांनादेखील निवडून आणण्याची त्यांच्याच धमक. पण मध्यतंरी लोकसभा निवडणुकीच्या वेळी वंचित बहुजन आघाडीत घुसले. प्रकाश आंबेककरांना त्यांना प्रदेश पातळीवर मानाचे प्रवक्तेपदही दिले. त्यांची शहर उत्तरची निवडणूक लढवून दुसऱ्या क्रमांकाची मतेही घेतली. पण काय झाले कुणास ठाऊक त्यांनी बहुजन वंचित आघाडीला सोडचिठ्ठी दिली. आणि राष्ट्रवादीच्या ट्रॅकवर आले खरे पण मध्ये लटकले. राज्यातील सरकार बदलाच्या वावटळीत ते सध्या ट्रॅकवरच उभे आहेत. पुढील 'चलनबत्ती' पाहून 'सिग्नल' देण्याचा त्यांनी आपला इरादा पक्का केल्याचे दिसतंय.

**माढ्याचे माजी आ. धनाजीराव साठे...**, तसं शांत आणि संयमी व्यक्तिमत्व. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या खास मर्जीतले. म्हणूनच हे विधानपरिषदेचे आमदार झाले. माढा शहरापुरते मर्यादित राजकारण करणारे. नगरपरिषद, बाजार समिती, माढ्यातील सहकारी संस्था आपल्या आप्तस्वकियांकडे असाव्यात एवढी त्यांची रास्त अपेक्षा. संपूर्ण माढा तालुक्याच्या राजकारणात आ. बबनराव शिंदे यांचा दबदबा असला तर माढा शहरात मात्र ते साठेंच्या 'वाटे'ला जात नाहीत. 'जा बाबा जा... दिल्या घरी सुखी रहा...' असे शिंदे यांचे अप्रत्यक्ष म्हणणे असते. हा शिंदे यांचा मोठेपणाच म्हणावा लागेल. तसे धनाजीराव साठे हे सर्वच पक्षातील नेत्यांना 'गोंजारुन' ही आहेत आणि 'धरुन' ही आहेत. ते कुंपणाच्या नादी जास्त लागत नाहीत, हे त्यांचे वैशिष्ट्य



## आ.सातपुतेंचे आरोग्यम् धनसंपदा धोरण ठरतंय प्रभावशाली

**विकास कामांना आरोग्य धनसंपदाची जोड देत टेक केअरचा उपक्रम राबवीत आमदार राम सातपुते यांनी माळशिरस तालुक्याच्या राजकीय पटलावर आपली विशेष अशी आदर्श मानवतावाद जोपासणारी प्रतिमा निर्माण केली असून त्यांचे हे नाविन्यपूर्ण धोरण प्रभावशाली ठरताना दिसत आहे.**

**डी.एस.गायकवाड**

माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते हे सध्या एका वेगळ्याच कारणाने सुप्रसिध्द होताना दिसत असून विकास कामांबरोबरच ते अनेक रुग्णांवर पुणे येथे मोफत उपचार करून रुग्णसेवा मोठ्या प्रमाणात करताना दिसत आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्यम् धनसंपदा हे धोरण प्रभावशाली ठरताना दिसत असून जनतेतून त्यांच्या या कार्याचे कौतुक होताना दिसत आहे. त्यामुळे ते एक राजकीय व्यक्तिमत्व असले तरी अनेक दुः खितांचे त्यांच्याकडून अश्रू पुसले जात असल्याने त्यांच्या नेतृत्वाची चर्चा सर्वदूर होताना दिसत आहे.

आजकालची राजकारणी मंडळी फारसा मानवतावाद जोपासताना दिसत नाहींत. पण याला आमदार सातपुते अपवाद ठरले आहेत. मानवतावादी धर्मानुसार त्यांची सेवा अविरतपणे होताना दिसत आहे. सुखात जाऊ द्या पण दु:खात जो माणूस मिसळतो, तो माणूस आपला वाटू लागतो. दु:ख प्रसंगी केलेल्या मदतीचा विसर पडणे अशक्य आहे. मानवतावादी धर्म स्वीकारून जो वागत गेला. त्याचा जयजयकार होत गेला असाच जय जयकार सध्या आमदार राम सातपुते यांच्या कार्यातून व्यक्त केला जात असून दातृत्व मातृत्व आणि कर्तृत्व लाभलेल्या या नेत्यामुळे सध्या असंख्य पीडितांना न्याय मिळताना दिसतो आहे. त्यांच्या जीवनात प्रकाशाची सूर्यकिरणे नव्याने प्रवेश करताना दिसत आहेत. जीवन जगण्याची उमेद त्यांनी वाढवली आहे.

राजकारण तेवढ्यापुरते या वाक्यानुसार सध्या माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार राम सातपुते वागताना दिसत असून समाजकारणाला वाहून घेतलेले एक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची सध्या ओळख सर्व दूर होताना दिसत आहे.

### अनेक कुटुंबांचे ठरले आधारवड

कोरोना कालावधींनंतर मानवी जीवन पूर्णतः बदलून गेले आहे हर घर रुग्ण अशी म्हण जणू प्रचलित झाली आहे. वेगवेगळ्या व्याधींनी अनेक जण आज जीवन जगताना दिसतात तर दुसरीकडे महागडे दवाखाने यामुळे गरिबीत आणखी वाढ अशी परिस्थिती आहे आणि यातच शस्त्रक्रिया करण्याचा प्रसंग एखाद्या कुटुंबातील सदस्यावर आला की पुरते घरच हादरून जाते पाच दहा लाखाची ऑपरेशन्स करायची तर कशी हा प्रश्न तसा गंभीरच पण अशा अनेक कुटुंबांचे आधारवड ठरले आहेत ते म्हणजे आमदार राम सातपुते....

**पंढरपूरच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. नुकतेच विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी खा. शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यामुळे नाराज झालेले भगिरथ भालके राष्ट्रवादीला रामराम करण्याच्या तयारीत आहेत. ते काँग्रेसमध्ये जातील असे वाटत असतानाचा त्यांना भारत राष्ट्र समितीचे प्रमुख (बीआरएस) तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांच्या कार्यालयातून पक्षप्रवेशासाठी संपर्क साधून मोठी ऑफर आल्याची माहिती आहे. मात्र, भालके यांनी मात्र वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली आहे.**

# 'बीआएस' ची ऑफर भालकेंची होणार सफर

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या प्रांगणात शेतकरी मेळावा झाला. त्या मेळाव्यात अभिजीत पाटील यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाला आणि विधानसभा उमेदवारीबाबत संकेतही दिले. त्यामुळे भालके नाराज झाले. त्यानंतर त्यांनी पंढरपूर दौऱ्यावर आलेले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतली. त्यामुळे भालके काँग्रेसवासी होणार का? अशी चर्चा असतानाच तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कार्यालयातून भगीरथ भालके यांना फोन आला आणि पक्षप्रवेशाची ऑफर देण्यात आली. विधानसभेच्या उमेदवारीसह पक्षाची आणखी काही जबाबदारी देण्याचा शब्दही राव यांच्याकडून देण्यात आल्याची माहिती आहे. भालके यांना बीआरएसमध्ये सामील करून घेण्याची जबाबदारी मुख्यमंत्री राव यांनी त्यांची कन्या आणि निकटवर्तीय आमदारावर सोपवली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा हादरा बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### वेट अँड वॉचची भूमिका

भगीरथ भालके यांनी भारत राष्ट्र समितीत प्रवेश केला तर पंढरपूर-मंगळवेढ्यात राष्ट्रवादीला मोठा धक्का बसू शकतो. आता भालके काय निर्णय घेतात, याकडे मतदारसंघातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. सध्या तरी भालके यांनी 'वेट अँड वॉच' भूमिका घेतली आह.

# आगामी निवडणुकीसाठी पाण्याचे राजकारण

**सध्या लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. सर्वच पक्ष यासाठी तयारीला लागले आहेत. आपापल्या परीने वेगवेगळे मुद्दे काढून रान तापवू लागले आहेत. माढा मतदारसंघ गत निवडणुकीत पहिल्यांदाच भाजपने ताब्यात घेतला खरे पण अपेक्षित विकास साधता आला नसल्यामुळे भाजपने सध्या नीरा देवधरच्या पाण्यावरुन राजकारण तापवले आहे. भाजपने नीरा देवधरची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी निधीची तरतूद केल्याचे भाजपने सांगितले.**

**संजय पाटील**

आम्ही ३१०० कोटींचा निधी मंजूर केला असून ५०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे, असे भाजपने जाहीररित्या सांगणे सुरु केले आहे तर बारामती व इंदापुरला गेल्या अनेक वर्षापासून पवारांनी पळविलेले पाणी आम्ही पुन्हा सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस ,पंढरपूर, सांगोला व सातारा जिल्ह्यातील फलटण, खंडाळा, माण, खटाव तालुकयाला मिळणार आहे, असा प्रचार सध्या भाजपकडून सुरु असून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपने पाण्याचा डाव टाकत मतदान खेचण्याचा प्रयत्न सध्या चालवला आहे. यामुळे माढा तसेच सातारा लोकसभा मतदार संघात मतदान खेचून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे मात्र याचा बारामती मतदारसंघात भाजपला नुकसान सहन करावे लागेल. पण सध्या भाजपचे पवारविरोधी पाण्याचे कार्ड कितपत चालणार हे आगामी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत कळणार आहे. तर आपल्या ताब्यातून गेलेला मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस परत ताब्यात घेण्याच्या तयारींत आहे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस भाजपविरोधात कोणते कार्ड वापरणार याकडे सध्या लक्ष लागले आहे. मात्र पाण्याचे कार्ड वापरुन पवारांना नामोहरण करण्याची रणनीती भाजपने आखली आहे.



**२०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शहर मध्य मतदार संघात एमआयएमने लक्षवेधी अशी कामगिरी केली. त्यानंतर झालेल्या महापालिका निवडणुकीतही एमआयएमचे ९ नगरसेवक निवडून आले. त्यामुळे सोलापूर शहरात एमआयएमचे प्रस्थ वाढले होते. पक्षाचे प्रमुख खासदार ओवेसी हे सोलापूरवर बारिक लक्ष देऊन होते. त्यामुळे पुन्हा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत फारुक शाब्दी यांच्या रूपाने शहर मध्यमध्ये एमआयएमने चमकदार कामगिरी केली. मात्र सध्याच्या काळात एमआयएम पक्षाच्या हालचाली जरा थंडावल्या आहेत. आता महापालिका निवडणुका जवळ आल्या आहेत. गतवेळची कामगिरी एमआयएम पुन्हा या निवडणुकीत करणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# कार्पोरेशन इलेक्शन एमआयएमसाठी आव्हानात्मक

## शाब्दी यांना ॲक्टिव्ह होण्याची गरज

**अजित उंब्रजकर**

२०१९ मध्ये फारुख शाब्दी यांना शहर मध्यमधून एमआयएमची उमेदवारी देण्यात आली. या मतदारसंघात नवखे असताना आणि आपल्या पक्षातील लोकांची साथ मिळाली नसतानाही फारूक शाब्दी यांनी चमकदार कामगिरी करत दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली. विशेष म्हणजे त्यांनी २०१४ मध्ये तौफिक शेख यांना जेवढी मते मिळाली होती, त्यापेक्षाही जास्त मते मिळवून दाखवली. त्यानंतर



तौफिक शेख यांनी एमआयएम पक्ष सोडून राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला. तेव्हापासून सोलापूर एमआयएमवर फारूक शाब्दिक यांचे वर्चस्व निर्माण झाले. तोफिक शेख यांच्यासोबत सहा नगरसेवक राष्ट्रवादी पक्षात दाखल झाले तर उर्वरित ३ नगरसेवक फारूक शाब्दी यांच्याबरोबर राहिले. एमआयएमचे नगरसेवक रियाज खरादी यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शाब्दी यांनी एमआयएम वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विविध सेलच्या माध्यमातून कार्यकर्ते जोडण्यासाठी प्रयत्न केले. महिला आघाडीही सक्षम करण्याचा प्रयत्न केला. मध्यंतरी शाब्दी यांनी खासदार ओबीसी यांचा मोठा मेळावाही सोलापूर शहरात घेतला. त्यामुळे महापालिका निवडणुकीत एमआयएम पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करेल असे सर्वांना वाटत होते. मात्र दरम्यानच्या काळात महापालिका निवडणुकाही रखडल्या आणि फारूक शाब्दी आपल्या आणि कुटुंबीयांच्या आजारपणात अडकले. त्यानंतर मात्र एमआयएमने कोणताही मोठा कार्यक्रम अथवा मेळावा शहरात घेतला नाही. या दरम्यान एमआयएमचे अनेक पदाधिकारी काँग्रेस पक्षात गेले. वास्तविक पाहता शहर मध्य मतदारसंघात मुस्लिम समुदायाची मोठी संख्या आहे. गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत याच मतदारसंघातून एमआयएमला चांगली मते मिळाली होती. महापालिका निवडणुकीतही याच मतदारसंघातून त्यांचे नगरसेवक निवडून आले होते. एमआयएमचा जर सोलापुरात आमदार झाला तर शहर मध्य मधूनच होईल, अशी आशा खुद्द खा. ओवेसी यांना आहे. त्यामुळेच ते सोलापूरवर बारिक लक्ष देऊन आहेत. दरवेळी त्यांची फारूक शाब्दी यांच्याबरोबर चर्चा होताना सोलापूरबद्दल ते आवर्जून जाणून घेतात. एवढी चांगली संधी असताना एमआयएमचे फारुक शाब्दी सोलापुरात अद्यापही क्टिव्ह का झाले नाहीत, याची चर्चा आता पक्षासह मतदारसंघातही होत आहे.

दिवाळीपर्यंत महापालिका निवडणुका लागतील, अशी शक्यता सर्व पक्षाकडून वर्तवण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आता फारूक शाब्दी यांनी शहरात लवकरात लवकर ॲक्टिव्ह व्हावे, अशी अपेक्षा कार्यकर्त्यातून व्यक्त होत आह. गत निवडणुकीत भरीव कामगिरी करणाऱ्या एमआयएमला यंदाच्या निवडणुकीत मोठा संघर्ष करावा लागणार आहे. अशा परिस्थिती असताना आता पक्ष प्रमुख शाब्दी यांनी लवकरात लवकर सक्रिय होण्याची गरज आह.

### खा. ओवेसी, खा. जलील यांची क्रेझ कायम

मुस्लिम समाजात खास करून एमआयएमच्या कार्यकर्त्यांमध्ये आजही पक्षप्रमुख खासदार ओवेसी आणि संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील यांची क्रेझ अद्यापही कायम आहे. गेल्या वर्षी झालेल्या मेळाव्यामध्ये या दोघांनी जोरदार भाषण केले होते. त्याला एमआयएमच्या कार्यकर्त्यांकडून आणि युवकांकडून जोरदार प्रतिसादही मिळाला होता. त्यामुळे या दोघांच्या असलेल्या क्रेझचा फायदा शाब्दी हे महापालिका निवडणुकीत करून घेणार का? याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.



### शहर मध्यवरच सर्वांचा फोकस

येणाऱ्या महापालिका निवडणुकीत शहर मध्य मतदारसंघावरच सर्व नेत्यांचा फोकस असणार आहे. या मतदार संघाच्या प्रणिती शिंदे आमदार आहेत. त्यामुळे येथून जास्तीत जास्त काँग्रेसचे नगरसेवक आणण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. दुसरीकडे दक्षिण आणि उत्तर मध्ये भाजपचे आमदार आहेत, शहर मध्यमध्ये भाजपचा आमदार निवडून आणायचा असेल तर येथे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणावे लागणार आहेत. त्यामुळे भाजपही येथे जोरदार प्रयत्न करणार आहे. याशिवाय नव्याने आलेल्या बीआरएस पक्षाचाही शहर मध्य मतदार संघावर डोळा आहे. येथील पद्मशाली समाज बीआरएसकडे आकर्षित होईल, असे त्यांच्या नेत्यांना वाटत आहे. याशिवाय या भागात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात असल्यामुळे याच मतदारसंघावर एमआयएमचेही लक्ष असणार आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोलापूर शहराध्यक्ष
**मा. श्री. जैनुद्दीन शेख** यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

मराठी हृदयसम्राट

मा. श्री. राज ठाकरे

मनसे नेते

मा. श्री. दिलीप (बापू) धोत्रे

जिल्हाध्यक्ष

मा. श्री. विनायक महिंद्रकर
सोलापूर शहराध्यक्ष

मोहोळ ता. अध्यक्ष

ॲड. कैलास खडके





मा. श्री. जैनुद्दीन शेख

शुभेच्छूक
श्री. शाहुराजे देशमुख, मोहोळ शहराध्यक्ष, उत्तरेश्वर शिंगाडे